cmyk

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१०९ | शुक्रवार दि.०९ ऑगस्ट २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

**संपादकीय**

## आर्थिक साक्षरतेचा अभाव...

जागतिक अर्थव्यवस्थेत अमेरिका हा आजही प्रमुख देश म्हणून गणला जातो. तेथील बारीक सारीक घटनांचेही जगभर पडसाद उमटत असतात. मग ते राजकीय स्थित्यंतर असो किंवा रोजगार, आर्थिक किंवा अन्य कुठलीही घटना असो. अमेरिकेच्या ब्युरो ऑफ लेबर स्टॅटिस्टिक्सने अलीकडेच आपला रोजगारविषयक अहवाल प्रसिद्ध केला आहे. या अहवालातून या देशातील बेरोजगारीची धक्कादायक आकडेवारी समोर आलेली दिसते. त्यानुसार जुलै २०२४ मध्ये अमेरिकेत ३.५२ लाख लोक बेरोजगार झाले असून, एकूण बेरोजगारांची संख्या ७२ लाखांवर पोहोचल्याचे आकडेवारी सांगते.

## अरविंद केजरीवालांच्या न्यायालयीन कोठडीत २० ऑगस्टपर्यंत वाढ

नवी दिल्लीः दिल्ली मद्य धोरण गैरव्यवहाराच्या सीबीआय तपास करत असलेल्या प्रकरणात राऊस अव्हेन्यू न्यायालयाने गुरुवारी (दि.८) मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची न्यायालयीन कोठडी २० ऑगस्टपर्यंत वाढवली आहे. त्यांना तिहार तुरुंगातून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे न्यायालयात हजर करण्यात आले होते. केजरीवाल हे दिल्ली मद्य धोरण प्रकरणाचे मुख्य सुत्रधार असल्याचे सीबीआयने म्हटले आहे. त्यांच्या अटकेशिवाय या प्रकरणाचा तपास होऊ शकत नाही म्हणत सीबीआयने २६ जून रोजी केजरीवाल यांना अटक केली होती. तत्पुर्वी ईडीने २१ मार्च रोजी केजरीवाल यांना अटक केली होती.

# अन्याय थांबवा; हमीभाव द्या!

### शेतकरी प्रश्नांवरून विरोधक संतापले; कांदा – बटाट्याची माळ घालून खासदारांचे संसदेबाहेर निदर्शने

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**देशांतर्गत सध्या कांद्यासह इतर विविध शेती पिकांना दर मिळत नाही. त्यातच हरियाणासह महाराष्ट्र आणि झारखंडच्या शेतकऱ्यांनी हमीभावाच्या किंमतीवर सर्वच पिकांची खरेदी करण्याची मागणी लावून धरली आहे. संसदेतही विरोधी पक्षातील खासदारांनी देखील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसह हमीभाव कायदा करावा, अशी मागणी केली आहे. परंतू सरकार याकडे कानाडोळा करत आहे. याविरोधात गुरूवारी (ता.८) इंडिया आघाडीतील विविध घटक पक्षांच्या खासदारांनी सरकारचा निषेध केला. तसेच संसदेबाहेर गळ्यात कांदा आणि बटाट्याची माळ घालून निदर्शने केली.**



यावेळी राज्यातील शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे खासदार निलेश लंके, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या प्रियंका चतुर्वेदी यांच्यासह तृणमूल काँग्रेस, राष्ट्रीय जनता दल, झारखंड मुक्ती मोर्चासह इतर पक्षांचे खासदार उपस्थित होते. यावेळी विरोधी खासदारांनी शेतकऱ्यांच्या मागणीप्रमाणे हमीभाव कायदा करावा आणि पिकांना हमीभाव द्यावा, अशी मागणी केली आहे. खासदारांनी सरकारविरोधात संसद भवनाच्या मकर गेटजवळ निदर्शने केली. तसेच 'शेतकऱ्यांना हमीभाव द्या' आणि 'शेतकऱ्यांवरील अन्याय थांबवा' अशा घोषणाही उपस्थित खासदारांनी दिल्या. नीतीश कुमार यांचा जनता दल आणि चंद्रबाबू नायडू यांच्या तेलुगू देशम पार्टीलाच सगळ देण्यात आले आहे. मात्र शेतकऱ्यांना हमीभाव दिला जात नाही. आम्ही शेतकऱ्यांसाठी हमीभावाची मागणी करत आहोत, असा टोला खासदार चतुर्वेदी यांनी लगावला. तसेच कांद्याच्या निर्यातीवरील निर्बंध उठवावेत, अशीही मागणी चतुर्वेदी यांनी केली आहे. यावेळी आरजेडीचे खासदार मनोज झा यांनी हमीभावाचे समर्थन करताना, केंद्र सरकारवर टीका केली आहे. झा म्हणाले, कांदा आणि बटाटा उत्पादक शेतकऱ्यांची मागणी आता पुढे आली आहे. तर हमीभाव मोठा मुद्दा असून त्यावर अद्यापही सरकार निर्णय घेत नाही. उलट सभागृहात खेळाडूंच्या अन्न खर्चाचा हिशेब सरकार देत आहे. यावरून दुःख आणि लाज वाटत असल्याचे झा म्हणाले. दरम्यान, सुप्रिया सुळे यांनी देखील बुधवारी जीवनावश्यक ◀◀ पान २ वर

## अंमळनेर ते विधनवाडी नविन रेल्वे लोहमार्गाची आज चाचणी



**बीड । प्रतिनिधी**

**अंमळनेर ते विधनवाडी दरम्यान नविन रेल्वे लोहमार्गाची जलदगती चाचणी शुक्रवार दि.९ ऑगस्ट रोजी होणार आहे.**

नगर– बीड– परळी या रेल्वे मार्गावरील अंमळनेर ते विधनवाडी या नविन लोहमार्गाची जलदगती चाचणी शुक्रवारी सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.०० या कालावधीत होणार आहे. नागरिकांनी रेल्वे मार्गापासून दूर रहावे. तसेच गुरे, पाळीव प्राणी इत्यादी रुळावर येणार नाहीत याची काळजी घ्यावी. लोहमार्गालगत कोणीही वावरू नये अथवा ओलांडू नये, असे आवाहन करीत याबाबत गावाच्या सरपंचांनी गावकऱ्यांना कळवावे. अशा सतर्क सूचना उपमुख्य अभियंता निर्माण अहमदनगर यांनी दिल्या आहेत.

# बीड जिल्ह्यात विमानतळ करण्यासाठी खा.बजरंग सोनवणे सरसावले

### संसदेत लावून धरली मागणी; अवघ्या दोन महिन्यात महत्वाचे प्रश्न मांडले





**..तर बीड जिल्ह्यात खरचं विकास येईल**

खा. बजरंग सोनवणे यांनी संसदेत आज जनतेच्या जिव्हाळ्याचा मुद्दा मांडला आहे. केंद्र सरकारने त्यांच्या मागणीचा विचार करुन बीड जिल्ह्यासाठी विमानतळ मंजूर केले तर खऱ्या अर्थाने बीड जिल्ह्यात विकास येईल, असे म्हटले जात आहे.

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हावासियांना विमानाने प्रवास करायचा असेल तर संभाजीनगर, लातूर आणि पुणे येथे जावे लागते. हे अंतर जास्त असल्याने वेळ आणि पैसाही वाया जात आहे. त्यामुळे बीड येथे विमानतळ मंजूर करुन तातडीने ते उभारण्यात यावे अशी आग्रही मागणी खा. बजरंग सोनवणे यांनी गुरुवारी संसदेत केली आहे. खा. सोनवणे हे खासदार झाल्यावर अवघ्या दोन महिन्यातच जिल्ह्यातील महत्वाचे प्रश्न संसदेत मांडत ◀◀ पान २ वर



**पश्चिम बंगालचे माजी मुख्यमंत्री बुद्धदेव भट्टाचार्य यांचे निधन**

कोलकाताः पश्चिम बंगालचे माजी मुख्यमंत्री आणि सीपीएम नेते बुद्धदेव भट्टाचार्य यांचे गुरुवारी (दि.८) सकाळी त्यांच्या दक्षिण कोलकाता येथील निवासस्थानी निधन झाले. त्यांनी वयाच्या ८० व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. गेल्या काही दिवसांपासून त्यांची तब्येत ठीक नव्हती. त्यांना श्वासोच्छवासाचा त्रास जाणवत होता. यामुळे त्यांना वारंवार रुग्णालयात दाखल करावे लागत होते. ◀◀ पान २ वर

# पहिल्या टप्प्यात ६ जिल्ह्यात जाणार राष्ट्रवादीची शिवस्वराज्य यात्रा

### खा.बजरंग सोनवणेंवर बीडच्या समन्वयाची धूरा



**सहा जिल्हे आणि समन्वयक**

पुणे–खा.अमोल कोल्हे, सोलापूर–खा.धैर्यशील मोहिते पाटील, धाराशिव–राहूल मोटे, लातूर–बसवराज पाटील नागराळकर, बीड–खा.बजरंग सोनवणे, जालना–आ.राजेश टोपे यांची जिल्हा समन्वयक म्हणून निवड केली आहे.

**बीड। प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी काँग्रेस–शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने महाराष्ट्र भरातील प्रत्येक जिल्ह्यात शिवस्वराज्य यात्रा धडकणार आहे. या यात्रेचा बीड जिल्हा समन्वयक म्हणून पक्षातर्फे बजरंग सोनवणे यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे.**

राष्ट्रवादी काँग्रेस–शरदचंद्र पवार पक्षाने लोकसभा निवडणूकीत भाजपने पंकजा मुंडे यांची उमेदवारी जाहिर केल्यानंतर काही दिवस वेट अँड वॉच करून याठिकाणी पंकजा मुंडेंच्या विरोधात सक्षमपणे कोण निवडणूक लढवू शकतो, याची चाचपणी केली. यात खा.बजरंग सोनवणे यांचे नाव आघाडीवर ◀◀ पान २ वर

## हिजाब बंदी : विद्यार्थीनी थेट सुप्रीम कोर्टात

मुंबई :मुंबईच्या महाविद्यालयातील हिजाब बंदीच्या प्रकरणावर सर्वोच्च न्यायालयात शुक्रवारी सुनावणी होणार आहे. चेंबूर ट्रॉम्बे एज्युकेशन सोसायटीच्या एन. जी. आचार्य आणि डी. के. मराठे महाविद्यालयात हिजाब आणि बुरखा घालून येण्यास संस्थेने प्रतिबंध घातला आहे. याला आक्षेप घेत काही विद्यार्थिनींनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. तिथे याचिका फेटाळली गेल्यानंतर नऊ विद्यार्थिनींनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. महाविद्यालयाने ◀◀ पान २ वर

## काँग्रेस नेते उद्यापासून मराठवाडा, विदर्भाच्या दौऱ्यावर

**मुंबई । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सज्ज झाली असून १० ऑगस्टपासून मराठवाडा आणि विदर्भात जिल्हानिहाय बैठका घेतल्या जाणार आहेत. प्रभारी रमेश चेन्नीथला, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस मुकुल वासनिक, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, विधान परिषद गटनेते सतेज ऊर्फ बंटी पाटील, प्रदेश कार्याध्यक्ष माजी मंत्री नसीम खान, माजी मंत्री अमित देशमुख हे जिल्हानिहाय बैठका घेऊन काँग्रेस नेते पदाधिकारी यांच्याशी चर्चा करून निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेणार आहेत. मराठवाड्यातील दौऱ्यात १० ऑगस्ट रोजी लातूर येथे लातूर, धाराशीव, बीड जिल्हा, दि. ११ ऑगस्ट रोजी नांदेड येथे नांदेड, परभणी आणि हिंगोली जिल्हा ◀◀ पान २ वर

# राज ठाकरे आज बीड मुक्कामी

### विधानसभानिहाय घेणार पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक

बीड । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीत महायुतीला बिनशर्त पाठिंबा दिल्यानंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेना आगामी विधानसभा निवडणुका स्वबळावर लढणार आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी महाराष्ट्र दौरा सुरु केला असून पहिल्या टप्प्यात त्यांनी मराठवाडा केंद्रीत केला आहे. दरम्यान, शुक्रवारी



(दि.९) मनसे अध्यक्ष राज ठाकरे बीड जिल्हा दौऱ्यावर येणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष सुमंत धस यांनी दिली.

लोकसभा निवडणुकीनंतर आता महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचे वारे वाहत आहेत. सर्व राजकीय पक्षांनी या निवडणुकीची तयारी सुरु केली आहे. मनसेने देखील निवडणुकीच्या मैदानात उतरण्यासाठी कंबर कसली आहे. ◀◀ पान २ वर

## कंटेनरच्या धडकेत अंभोरा येथील दोन युवक ठार

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

**आष्टी तालुक्यातील अंभोरा येथील दोन युवक घोगरगाव येथे कामानिमित्त मोटार सायकलवरून जात असताना पाठीमागून येणाऱ्या कंटेनरने त्यांना जोराची धडक दिली. यात हे दोन युवक जागीच ठार झाले.**



मृतांमध्ये राजेश बबन थोरात (२८) व शेखर नवनाथ मिसाळ (३४) यांचा समावेश आहे. हा अपघात नगर – सोलापूर या रस्त्यावर झाला. या घटनेने गावावर शोककळा पसरली असून, पंचक्रोशीतून हळहळ व्यक्त होत आहे. राजेश बबन थोरात यांच्या पाठीमागे वडील, एक भाऊ असा परिवार आहे तर शेखर मिसाळ यांच्या पाठीमागे आई, बायको, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे.

## जगभरातील आपत्ती निरीक्षणासाठी इस्रोची मोहिम!

### स्वातंत्र्यदिनाला इओएस–८ उपग्रहाचे करणार खास प्रक्षेपण

**श्रीहरिकोटा । वृतसंस्था**

येथील भारतीय अंतराळ संस्थेने इस्रो स्वातंत्र्यदिनाला देशवासियांना एक खास भेट देणार आहे. इस्रोच्या माहितीनुसार १५ ऑगस्ट रोजी श्रीहरिकोटा, आंध्र प्रदेश येथून ईओएस–८ उपग्रह प्रक्षेपित करेल. या मिशनच्या उद्दिष्टामध्ये देशातील आणि जगभरातील आपत्तींचे निरीक्षण करणे आणि त्याबद्दल सतर्क करणे याचा समाविष्ट आहे. यासंदर्भात इस्रोने सांगितले की, आगामी १५ ऑगस्ट रोजी आंध्र प्रदेशातील श्रीहरिकोटा येथून इओएस–८ उपग्रह प्रक्षेपित केला जाईल. ईओएस–८ मिशनची प्राथमिक उद्दिष्टे सूक्ष्म उपग्रहांची रचना करणे आणि पेलोड उपकरणे तयार करणे आणि भविष्यातील उपग्रहांसाठी आवश्यक नवीन तंत्रज्ञान समाविष्ट करणे आहे. ईओएस–०८ सूक्ष्म उपग्रह १५ ऑगस्ट रोजी ◀◀ पान २ वर

## गुगल पे, फोन पे पेमेंट प्रणालीत होणार बदल

### पिन पद्धतीत मोठा बदल, बायोमेट्रिक युपीआय पेमेंट करणे शक्य

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**ऑनलाइन पेमेंट पूर्वीच्या तुलनेत अधिक सुरक्षित करता यावे यासाठी नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया म्हणजेच एनपीसीआयनं एक नवीन प्लॅन तयार केला आहे. मात्र, त्याचा थेट परिणाम ऑनलाइन पेमेंट युजर्सवर होणार आहे. सध्या ऑनलाइन पेमेंट करण्यासाठी ४ किंवा ६ अंकी पिन पासवर्ड टाकावा लागतो, पण आता त्यात बदल होणार आहे. येत्या तीन महिन्यात बायोमेट्रिक युपीआय पेमेंट करणे शक्य होणार आहे.**

एनपीसीआय यूपीआय–आधारित ऑनलाइन पेमेंटला पिन पासवर्डऐवजी बायोमेट्रिक ऑथेंटिकेशन सुरू करण्यासाठी काही स्टार्टअप्सशी चर्चा करत आहे. गेल्या आठवड्यात रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानेही ओटीपी आणि कार्ड व्यवहारांसाठी बँकांना नवे पर्याय शोधण्यास सांगितले होते. आजच्या काळात कार्ड पेमेंट करण्यासाठी मोबाईल ओटीपीची गरज असते. तसेच यूपीआय पेमेंटसाठी पिन पासवर्ड आवश्यक असतात. परंतु नवीन बदलांमुळे युजर्स फिंगरप्रिंट ◀◀ पान २ वर

**बाजारभाव**

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.०६ ऑगस्ट २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू :२.५० क्विंटल | २,६५० | २,९९० | २,८२० |
| ज्वारी/हायब्रिड :३९.५० क्विंटल | २,००० | ३,३०० | २,३४७ |
| मूग :१४.५० क्विंटल | १,९५० | ३,०४१ | २,४५५ |
| तूर : २.०० क्विंटल | ९,४०१ | ९,४०१ | ९,४०१ |
| उडीद : २.५० क्विंटल | ४,९०१ | ७,४०० | ६,१५० |
| बाजरी: ११.०० क्विंटल | २,००० | ३,४०० | २,७९६ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: १३.०० क्विंटल | ४,२६० | ४,३०० | ४,२८० |
| हरभरा: ५.०० क्विंटल | ५,७०१ | ७,३५० | ६,५८३ |

# हॉकी संघाने जिंकले कांस्य पदक!

### कर्णधार हरमनप्रीत सिंग विजयाचा नायक तर गोलरक्षक पीआर श्रीजेशनची शानदार कामगिरी

**पॅरिस । वृतसंस्था**

**भारताच्या पुरुष हॉकी संघाने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये तिरंगा फडकवला असून सलग दुसऱ्या ऑलिम्पिकमध्ये कांस्य पदक पटकावण्याची किमया केली. गुरुवारी (दि.८) कांस्य पदकाच्या लढतीत टीम इंडियाने स्पेनचा २–१ पराभव करून देशाला ऐतिहासिक असा विजय मिळवून दिला. कर्णधार हरमनप्रीत सिंग भारताच्या विजयाचा नायक ठरला. त्याने सामन्यात सलग दोन गोल करून संघाच्या विजयात मोठा वाटा उचलला.**



पहिल्या क्वार्टरमध्ये दोन्ही संघांमध्ये चुरशीची लढत झाली. सामन्याच्या सहाव्या मिनिटाला भारतीय खेळाडू सुखजित सिंगने चेंडूसह डीमध्ये धडक मारली. पण त्याने गोल करण्याची संधी गमावली. स्पेनने ९ व्या मिनिटाला संधी निर्माण केली. स्पॅनिश खेळाडू जोस बस्टेराने आक्रमणाचे नेतृत्व करत फटका मारला. पण भारतीय संघाची भिंत म्हणून ओळख असणाऱ्या गोलरक्षक पीआर श्रीजेशने अप्रतिम बचाव केला. अखेर हा क्वार्टर गोलशून्य बरोबरीत राहिला. स्पेनच्या संघाला १८ व्या मिनिटाला पेनल्टी स्ट्रोक देण्यात आला. मार्क मिरालेस पोर्टिलोने यावर गोल केला. अशाप्रकारे भारतीय संघ १–० ने पिछाडीवर पडला. त्यानंतर स्पेनला लगेचच २१ व्या मिनिटाला पेनल्टी कॉर्नर मिळाला, पण श्रीजेशने शानदार सेव्ह करून गोल होणे टाळले. भारतीय खेळाडूंनी पलटवार केला. २४ व्या मिनिटाला ललित आणि हार्दिकने हल्ले केले. पण गोल करू शकले नाही. येथे स्पॅनिश संघाने शानदार सेव्ह केले. २८ व्या मिनिटाला स्पेनच्या बोर्जा लॅकेलने भारताच्या गोलपोस्टवर हल्ला चढवला. भारतीय बचावपटूंनी तो वाचवला, पण स्पेनला पेनल्टी कॉर्नर मिळाला. मात्र, इथेही पीआर श्रीजेशने आपले कर्तव्य चोख बजावत गोल होऊ दिला नाही. सामन्याच्या ३० व्या मिनिटाला पेनल्टी कॉर्नरवर भारतीय कर्णधार हरमनप्रीत सिंगने गोल केला. त्याचा या स्पर्धेतील हा नववा गोल ठरला. या गोलनंतर हाफ टाईमपर्यंत १–१ अशी बरोबरी राहिली. तिसऱ्या क्वार्टरमध्ये सामन्याच्या ३३ व्या मिनिटाला भारताने आक्रमण केले. हार्दिक सिंगने चेंडू घेऊन स्पेनच्या डीमध्ये धडक मारली. यावेळी स्पॅनिश बचावपटूच्या पायाल चेंडू ◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# आर्थिक साक्षरतेचा अभाव...

जागतिक अर्थव्यवस्थेत अमेरिका हा आजही प्रमुख देश म्हणून गणला जातो. तेथील बारीक सारीक घटनांचेही जगभर पडसाद उमटत असतात. मग ते राजकीय स्थित्यंतर असो किंवा रोजगार, आर्थिक किंवा अन्य कुठलीही घटना असो. अमेरिकेच्या ब्युरो ऑफ लेबर स्टॅटिस्टिक्सने अलीकडेच आपला रोजगारविषयक अहवाल प्रसिद्ध केला आहे. या अहवालातून या देशातील बेरोजगारीची धक्कादायक आकडेवारी समोर आलेली दिसते. त्यानुसार जुलै २०२४ मध्ये अमेरिकेत ३.५२ लाख लोक बेरोजगार झाले असून, एकूण बेरोजगारांची संख्या ७२ लाखांवर पोहोचल्याचे आकडेवारी सांगते. आत्तापर्यंत अमेरिकेत मासिक २.१५ लाख इतक्या नोकऱ्या निर्माण होत होत्या. मात्र, त्यात आता लक्षणीय घट झाली असून, बेरोजगारीचा दर तब्बल ४.३ टक्क्यांवर गेला आहे. अमेरिकेत साधारणपणे १७ लाख लोकांना नोकरीवरून कायमस्वऊपी काढून टाकण्यात आले आहे. तर ११ लाख लोकांना हंगामी नोकरीवरून कमी करण्यात आले आहे. रोजगाराचे हे संकट म्हणजे संभाव्य मंदीची नांदीच होय. त्यात अमेरिकी अर्थव्यवस्थेत मंदीचे संकेत मिळाले, की गुंतवणूकदार आपला बाजारातील पैसा काढून घेतात, हा आजवरचा अनुभव आहे. मंदीचं मळभ गडद झाल्यानेच आत्ताही देशोदेशीचे बाजार घसरल्याचे दिसून येतात.

मुळात भारत आणि अमेरिका यांच्यातील धागे परस्परांशी अत्यंत घट्टपणे विणले गेले आहे. अमेरिकेत भारतीयांची संख्या लक्षणीय असून, काही गावे वा नगरे ही खास भारतीयांची म्हणूनही ओळखली जातात. स्वाभाविकच अमेरिकेवर बेरोजगारीच्या संकटाची छाया पसरत असेल, तर त्याची झळ भारताला वा भारतीयांनाही बसू शकते. भारतातील वाहन, ऊर्जा व आयटी क्षेत्रातील कंपन्या अमेरिकेवर बव्हंशी अवलंबून आहेत. त्यांना याचा सर्वाधिक फटका बसू शकतो. त्यामुळेच ब्लॅक मंडेतील पडझडीत या कंपन्यांचे शेअर कोसळले, असे म्हणण्यास वाव आहे. बेरोजगारीमुळे उत्पादनात घट होईल, मागणीही घटेल व त्याचा परिणाम भारताच्या निर्यातीवरही होईल, असेही मानले जाते. मात्र, केवळ हा एकमेवच घटक बाजार उठण्यास जबाबदार आहे, असे म्हणता येणार नाही. अमेरिका हा देश मागच्या काही दिवसांपासून राजकीय स्थित्यंतरातून जात आहे. येथील अध्यक्षपदाच्या निवडणुकीनेही वेगळे वळण घेतले आहे. त्याचीही धग अर्थकारणास बसत असल्याचे सांगण्यात येते. दुसऱ्या बाजूला पश्चिम आशियातील इराण व इस्राईलमध्ये सध्या युद्धाचे ढग आणखी गडद झाले आहेत. कोणत्याही दोन किंवा अधिक देशांमध्ये युद्ध किंवा युद्धजन्य स्थिती उद्भवते, तेव्हा त्याचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष परिणाम हे संबंध जगावर होत असतात.

पश्चिम आशियातील संघर्षाबद्दलही तसेच म्हणता येईल. हमास प्रमुखाच्या हत्येनंतर या दोन देशांमधील तणाव आणखीनच वाढला असून, खनिज तेलाच्या किमतीही भडकण्याची भीती आहे. सांप्रत संकटाचे हेही एक कारण. जपान हाही जागतिक अर्थकारणातला महत्त्वाचा देश. जपानच्या केंद्रीय बँकेने जवळपास १४ वर्षांनंतर व्याजदारांमध्ये ०.२५ टक्के इतकी वाढ केली. त्याचाही शेअर बाजारावर परिणाम झाल्याचे या क्षेत्रातील मंडळी सांगतात. यानंतर जपानचा बाजार निक्केई १२ टक्क्यांनी घसरला. तर तैवानच्या बाजारातही मागच्या ५७ वर्षांतील सर्वांत मोठी घसरण झाली. २०२० च्या कोरोना महामारीत जागतिक बाजाराला मोठा फटका बसला होता. भारतीय शेअर बाजारातही मोठी घसरण झाल्याने सेन्सेक्स अगदी ३० हजारांच्या खाली आला होता. त्यापूर्वी २०१६ मध्ये नोटबंदीच्या वेळी मार्केट ६ टक्क्यांनी घसरले, तर २००८ च्या आर्थिक मंदीत निर्देशांक १४०० अंकांनी घसरल्याचा इतिहास फार जुना नाही. तर १९९२ मध्ये हर्षद मेहताचा घोटाळा उघडकीस आल्यानंतर निर्देशांकाने पार २ हजार अंकांनी आपटी खाल्ली होती. अर्थात कोरोनानंतरच्या स्थितीचा आढावा घेतला, तर मागच्या दोन ते तीन वर्षांमध्ये भारतीय शेअर बाजाराचा आलेख सातत्याने उंचावताना दिसतो. ५० हजार, ७५ हजारांहून मागच्या काही दिवसांत निर्देशांकाची वाटचाल लाखाच्या दिशेने सुरू झाल्याचे दिसून येते.

पूर्वी मध्यमवर्गीयांचा कल हा बचतीकडे असे. आता म्युच्युअल फंड वा शेअर मार्केटकडे लोकांचा अधिकचा कल पहायला मिळतो. डि-मॅट अकाऊंट उघडलेल्यांची संख्या १५ ते १६ कोटींवर पोहोचणे, यातूनच काय ते स्पष्ट होते. अर्थात गुंतवणुकीचे कोणतेही पर्याय स्वीकारताना सावधानता व अभ्यास आवश्यक ठरतो. भारतातील शेअर बाजार सोमवारी दोन हजार अंकांनी कोसळल्यानंतर पुन्हा मंगळवारी त्यात सुधारण झाली. मात्र, या सगळ्यात गुंतवणूकदारांचे १५ लाख कोटी रूपयांचे नुकसान झाल्याचे सांगण्यात येते. यातून योग्य तो बोध घ्यावा. मुळात अर्थ साक्षर होण्याचा प्रयत्न करायला हवा. म्युच्युअल फंड वा शेअर बाजाराचा मार्ग अवलंबणे गैर नाही. परंतु, बचतीचे विविध पारंपरिक मार्गही महत्त्वाचे, हे विसरू नये. शेअर बाजारात संयम अत्यावश्यक. मार्केट पडले म्हणून हताश होऊन चालत नाही व वधारले म्हणजे हुरळून चालत नाही. शेवटी फुगे फुटत असतात. 'वॉरेन बफे इंडिकेटर'ने तसा इशाराही दिला होता. एकूणच काय तर जागते रहो याची कास धरण्याची गरज आहे.

# विकासापासून कोसो दूर असणाऱ्या मुस्लिम बहुल भागाच्या विकासासाठी कटिबद्ध –डॉ.ज्योती मेटे

**बीड । प्रतिनिधी**

**शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी विकास कामांचा सपाटा लावला असून बीड शहरातील शाहींनशावली, दाऊतपुरा या मुस्लिम बहुल भागात रस्ता कामांचे भूमिपूजन केले याप्रसंगी या भागातील नागरिकांसह शिवसंग्रामचे ज्येष्ठ नेते प्रभाकर कोलंगडे, जिल्हाध्यक्ष नारायणराव काशीद, अनिल घुमरे, सुहास पाटील, मनोज जाधव, अमजद पठाण, शेख आझर, पेंटर अख्तर, लालाभाई आदी.उपस्थित होते.**



लोकनेते विनायक मेटे यांनी कायम मुस्लिम समाजाला न्याय द्यायचा प्रयत्न केला सुरुवातीच्या काळात मुस्लिम समाजाचे सामूहिक इस्तेमाई शादिया करून त्यांनी अनेकांचे संसार उभे केले नंतरच्या काळात मराठा आरक्षणासोबतच मुस्लिम आरक्षणासाठी देखील लढा दिला आणि मुस्लिम आरक्षण प्रश्न थेट विधानसभेत मांडला हे करत असताना बीड येथील मुस्लिम समाजातील मुलींसाठी वस्तीग्रहाचे प्रश्न, तकिया मस्जिद येतील रस्ता विकास कामे त्यांनी केली. त्याचबरोबर बीड शहरातील अनेक मस्जिद समोर बोरवेल देऊन पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली २०२१ साली अनेक मुस्लिम बहुल भागात रस्ते मंजूर करून त्यांचे काम पूर्ण केले. आसे विविध काम करत त्यांनी नेहेमी मुस्लिम समजला न्याय देण्याचा प्रयत्न केला. त्याचा पाऊलावर पाऊल ठेवत डॉ. ज्योती मेटे यांनी आपण स्वर्गीय मेटे साहेबांचे मुस्लिम बहुल भागाच्या विकासाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी काम करत आहोत आणि मुस्लिम बहुल भागाच्या विकासासाठी सदैव कटिबद्ध राहू असे आश्वासन त्यांनी यावेळी उपस्थितांना देले.

# बागुल क्लिनीकच्या १२ व्या वर्धापन दिनानिमित्त१५०० जणांची मोफत तपासणी

अंबड। प्रतिनिधी

अंबड येथे बाबुल क्लिनिक च्या वतीने सौंदर्य व त्वचारोग,मधुमेह, स्त्रीरोग ,कान, नाक,घसा व अस्थिरोग, मूळव्याध, मानसिक विकार,औषधोपचार शिबीराचे उदघाटन माजी आरोग्य मंत्री राजेश टोपे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.या शिबीरामध्ये १५०० रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली.माजी आमदार शिवाजी चोथे ,



माजी आ.संतोष सांबरे,जी. प. सदस्य बाप्पासाहेब गोल्डे,मधु जिजा देशमुख, अमोल लहाने, कुमार रुपवते,माजी प्राचार्य भागवत कटारे, समदभाई बागवान,काशिनाथ जऱ्हाड महाराज, डॉ. संजय पगारे, डॉ. अशोक दांडगे, जगन्नाथ तलवाडकर ,सरपंच जगन दुर्गे,डॉ. योगेश ढेंबरे, सुशांत साबळे,रामभाऊ इंगळे, निखिल साळवे, अफरोज पठाण, मेजर कुणाल दहिवले,सिद्धार्थ रोटे,सचिन खराद,मा.चंद्रमणी खरात, संतोष जिगे, बाबुराव गोंटे धनंजय खंदारे ,जगन्नाथ नागवे ,रामकिसन घुगे,संजय ढोले,गीताविलास खुंटेफाळकर देवा,परमेश्वर चांदर महाराज,डॉ.राहुल बागुल (त्वचारोग तज्ञ),डॉ. बद्रीप्रसाद घुगे,डॉ. सचिन घाटगे, डॉ. दीपक उगले,डॉ. प्रवीण पारगावकर, डॉ. संदीप लाहोटी,डॉ. कालिंदा उढाण, डॉ. अश्विनी तुपे, डॉ. मनीषा खराबे, डॉ. कल्पना के पाईकराव, डॉ. रोहिणी घोगरे, डॉ. ऋतुजा ढेंबरे, डॉ. अनिता खंदारे,डॉ.पार्वती उगले,डॉ. वर्षा बागुल, लक्ष्मीबाई बागुल, प्रमिला बागुल,प्रा. पुनम लाहोटी,प्रा.जयमाला दखणे, आकांक्षा बागुल,. प्रज्ञा बागुल,श्रीकांत जायभाये, सचिन बागुल,मनोहर पटेकर, प्रा. संजय खोरे सर,जीवन मगरे, माऊली पवार,,दिनेश सातपुते, स्वप्नील देशमाने,भीमराव बनसोडे, राहुल साळवे, अच्युत उघडे, भागवत चाबुकस्वार,प्रशांत बागुल,सखाराम बोधले सरपंच , अशोक आठबैले,चत्रभुज टापरे विष्णू सोनावणे, शंकर ढेरे, गोधाजी कापसे, सिद्धेश्वर तायडे, विनोद राठोड, बंडू गितखाने,अनिल चौतमल, आनंद खरात, अशोक साळवे,अमोल जाधव, गणेश मुळे, वैभव गायकवाड, दीपक चौधरी, प्रशांत सबनीस, देवा देशपांडे,हिरालाल लाहोटी , रियाझ शेख, संदीप जाधव ,महाजन, तांबेकर,सतीश वाहुळे, मुसेफ खान,सचिन भोजने, योगेश बरसाले, विशाल खोजे, अमीर शेख, पवन बाबरे, ,यांच्यासह सर्व तज्ञ मान्यवर उपस्थित होते.

## मोती तलाव परिसरात तिरंगा ध्वज फडकवावा–राजेश राऊत

**जालना । प्रतिनिधी**



ऑगस्ट क्रांती दिन आणि ७७ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त छत्रपती संभाजी महाराज उद्यानलगत मोती तलाव परिसरात माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या प्रयत्नांनी साकारलेला विशाल तिरंगा ध्वज फडकवावा, जिल्ह्यात घरोघरी तिरंगा अभियान राबवावे तसेच जालना शहरातील मूलभूत समस्यांवर तातडीने कडक उपाययोजना कराव्यात अशा मागण्या माजी उपनगराध्यक्ष तथा भारतीय जनता पक्षाचे प्रदेश निमंत्रित सदस्य राजेश राऊत यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केल्या आहेत.

जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांना दिलेल्या लेखी निवेदनात राजेश राऊत यांनी म्हंटले आहे की, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या विशेष प्रयत्नांतून छत्रपती संभाजी महाराज उद्यानलगत मोती तलाव परिसरात विशाल तिरंगा ध्वज उभारण्यात आला. तथापि वादळ, पावसामुळे प्रशासनाने सदरील ध्वज उतरवला. ७७ वा भारतीय प्रजासत्ताक दिन आठ दिवसांवर आला असून या निमित्त उद्या शुक्रवारी ( ता. ०९) ऑगस्ट क्रांती दिनी सदरील तिरंगा ध्वज पुन्हा फडकविण्यात यावा. महाराष्ट्रात शासनाच्या वतीने सर्वत्र घरोघरी तिरंगा अभियान राबविले जात असून जालना जिल्ह्यातही प्रशासनाच्या वतीने सदर अभियान राबविण्यात यावे. अंबड चौफुली ते विशाल कॉर्नर पर्यंत वळण रस्त्यावर बंद असलेले पथदिवे सुरू करावेत, रामतीर्थ स्मशानभूमी जवळील पूल तसेच नूतन वसाहत परिसरातील उड्डाणपुलावर कठडे अनेक दिवसांपासून तुटले असून बांधकाम विभागातर्फे अद्याप कठडे बसविण्यात आले नाहीत, परिणामी वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो, तातडीने कठडे बसवावेत, असे राजेश राऊत यांनी नमूद केले. जालना शहरात मुख्य रस्त्यांवर भटके कुत्रे ,मोकाट जनावरे यांचा मुक्त संचार वाढला असून वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहेत. त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी मनपा प्रशासनास आदेश द्यावेत. नाव्हा चौफुली परिसरात मागील आठवड्याभरात अपघातांचे प्रमाण वाढले, त्यावर उपाययोजना म्हणून मंठा चौफुलीप्रमाणे नाव्हा चौफुलीवर सिग्नल यंत्रणा कार्यान्वित करण्यात यावी तसेच २४ तास पोलिसांची गस्त ठेवावी. जालना शहरात मागील महिनाभरात गुन्हेगारी प्रवृत्तीने डोके वर काढले असून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे .अशा स्थितीत आमली पदार्थ, अवैध शस्त्रास्त्रे याबाबत कडक पावले उचलावीत आणि जनतेला दिलासा द्यावा. अशा मागण्या राजेश राऊत यांनी केल्या.

# ताडहादगांव येथील पाझर तलावातील अतिक्रमण काढा अन्यथा १३ ऑगस्टला उपोषण

**जालना। प्रतिनिधी**

**ताडहादगांव (ता. अंबड) येथील पाझर तलाव गट क्रमांक ५३८ येथील संपादीत क्षेत्रात अनेकांनी अतिक्रमण केले. तसेच गट क्रमांक ५४७ मधील गायरान जमिनीवरील अतिक्रमण धारकांनी ग्रामपंचायतीला अवैध नमुना नंबर ८ ला नावे लावली आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून अतिक्रमण पाडावीत अन्यथा १३ ऑगस्ट रोजी जिल्हा परिषदेच्या जालना येथील कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा कुंडलिक विश्वनाथ हरिश्चंद्रे यांनी दिला आहे.**

### अतिक्रमण धारकांना नोटीसा

ताडहादगांव येथील पाझर तलाव क्रमांक ५३८ संपादीत क्षेत्रातमध्ये अतिक्रमण केल्याचे प्रथमदर्शनी लघुपाटबधारे जलसंधारण जि.प. जालना यांना दिसून आले आहे. याबाबत अतिक्रमणधारकांना जागेचा पुरावा काय आहे? याबाबत उपविभागीय अधिकारी जलसंधारण विभाग जि.प अंबड यांनी विचारणा करून, अतिक्रमण असल्यास येत्या ८ दिवसात अतिक्रमण काढून घ्यावे अशी सूचना नोटीस दिली आहे. सदर नोटीस उपअभियंता शेख जिल्हा परिषद उपविभाग ल.पा. अंबड यांनी दिली आहे.

याबाबत जिल्हा परिषदेच्या सिईओ यांना दिलेल्या निवेदनात म्हटले की, ताडहादगांव येथील गट क्रमांक ५३८ पाझर तलाव मधील अतिक्रमण व गट क्रमांक ५४७ सरकारी गायरान जमिनीवरील अतिक्रमणबाबत लेखी व तोंडी तक्रारी जलसंधारण विभत्तग, जिल्हा परिषद लघु पाटबंधारे व पंचायत समिती अंबड यांच्याकडे करण्यात आली होती. मात्र संबंधीत विभागाने याकडे दुर्लक्ष केले. सदरील जागेत अनेकांनी अतिक्रमण करून, प्लॉटची विक्री केली. आज रोजी सदर ठिकाणी आर.सी.सी. ची पक्के घरी आहेत. अतिक्रमणामध्ये सांडवाही गायब झाला. मुळ सांडव्याचा प्रवाह बदलून सांडवा अरूंद केला. यामुळे भविष्यात सांडव्यामुळे भविष्यात जीवीतहानी व जनावरांची हाणी होण्याचा धोकाही उत्पन्न झाला आहे. विशेष म्हणजे या अतिक्रमण संदर्भात अंबड पंचायत समितीचे विस्तार अधिकारी ए.ए. चव्हाण यांच्याकडे चौकशी देण्यात आली. मात्र विस्तार अधिकारी चव्हाण यांनी घटनास्थळी न जाता थातुर मातुर कार्यालयात बसून चौकशी केल्याचे कुंडलिक विश्वनाथ हरिश्चंद्रे यांनी तक्रारीत नमुद केले आहे. चौकशी करतांना विस्तार अधिकारी चव्हाण यांनी सदर ठिकाणी येवून पाहणी करणे गरजेचे होते. व पाझर तलाव व गायरान जमिनीत अतिक्रमण करणार्यांना नमुना नंबर ८ दिला कसा? याबाबत चौकशी करून अहवाल देणे अपेक्षीत होते मात्र त्यांनी सदर चौकशी कार्यालयात बसवून केल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. ताडहादगांवचा पाझर तलाव, गायरान जमिन अतिक्रमण प्रकरणासह बनावट चौकशी करणार्या विस्तार अधिकारी चव्हाण यांची चौकशी करून, न्याय द्यावा या मागणीसाठी १३ ऑगस्ट रोजी जि.प. जालना कार्यालयासमोर अमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.




# अंबड तहसीलदार चव्हाण यांनी पदभार स्वीकारला

अंबड । प्रतिनिधी

अंबडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांची बीड येथे बदली झाली असून त्यांच्या जागी छत्रपती संभाजीनगर इथून विजय चव्हाण यांनी आज ८ ऑगस्ट रोजी अंबड तहसील चे तहसीलदार पदाचा पदभार स्वीकारला यासंदर्भात तहसीलदार श्री विजय चव्हाण यांना चार्ज घेण्यासंदर्भात विचारले असता ते म्हणाले की माझ्या जागेवर दुसरे येणारे तहसीलदार हजर ना झाल्यामुळे मला छत्रपती संभाजी नगर इथून रिलीज ऑर्डर केले नाही तसेच ते म्हणाले की निवडणूक आयोगाचे आदेशावरून विधानसभा निवडणूक तयारीचे संदर्भातचे काम चालू आहे. मी अंबड चार्ज घेतल्यानंतर तहसीलदार चंद्रकांत शेळके साहेब नंतर बीडचा चार्ज घेतील अशी माहिती तहसीलदार विजय चव्हाण यांनी दिली आहे तसेच ते म्हणाले की, मी लवकरच चार्ज घेणार असल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात आले होते परंतु आज दि८ ऑगस्ट रोजी श्री चव्हाण यांनी पदभार स्वीकारला यावेळी सर्व कर्मचाऱ्याकडून त्यांचे स्वागत करण्यात आले.

## पान १वरून...

### अन्याय थांबवा;

वस्तूंच्या महागाईवरून सरकारवर टीका केली होती. त्यांनी जीवनावश्यक वस्तूंच्या महागाईत दिवसेंदिवस भरच पडत असून खाणेपिणे देखील महाग झाले आहे. याबाबत क्रिसिल एम आय ॲन्ड ए या अहवालात निष्कर्ष काढण्यात आला आहे. या अहवालानुसार सर्वसामान्य जनतेची शाकाहारी थाळी जुलै महिन्यात ११ टक्क्यांनी महागली तर मांसाहारी थाळीसाठी ६ टक्के जास्त मोजावे लागले असल्याचे म्हटले आहे. तर अन्नधान्य आणि भाजीपाला आदींच्या महागाईवर सरकारला नियंत्रण ठेवता आले नाही. तर महागाई नियंत्रणात करण्याचा प्रयत्न देखील होताना दिसत नाहीत. ही खेदाची बाब असल्याचेही टीका खासदार सुळे यांनी केली आहे.

-----------

### राष्ट्रवादीची शिवस्वराज्य यात्रा

होते. यानंतर बजरंग सोनवणे यांना उमेदवारी देण्यात आली आणि सोनवणे यांना जिल्हाभर असलेला संपर्क कामी आला. यातून पक्षाला मोठे यश मिळालेले असल्याने बजरंग सोनवणे यांचे पक्षातही वजन वाढलेले आहे. आता राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने महाराष्ट्रभरातील प्रत्येक जिल्ह्यात शिवस्वराज्य यात्रा काढण्यात येणार आहे. यासाठी पहिल्या टप्प्यात राज्यातील सहा जिल्ह्यांची निवड करण्यात आलेली असून यात पुणे-खा.अमोल कोल्हे, सोलापूर-खा.धैर्यशील मोहिते पाटील, धाराशिव-राहूल मोटे, लातूर-बसवराज पाटील नागराळकर, बीड-खा.बजरंग सोनवणे, जालना-आ.राजेश टोपे यांच्या खांद्यावर समन्वयाची धुरा देण्यात आलेली आहे. छत्रपती शिवरायांची पावनभूमी असणाऱ्या जुन्नर तालुक्यातील शिवनेरी किल्ला येथून या यात्रेचा शुभारंभ होणार आहे. दरम्यान, लवकरच बीड जिल्ह्यातही या यात्रेचे भव्य आयोजन करण्यात येईल. शिवस्वराज्य यात्रा महाराष्ट्राच्या स्वाभिमानाची, अस्मितेची यात्रा आहे. ही यात्रा बीड जिल्ह्यात अतिभव्य आयोजनात पार पडेल, हा विश्वास देतो, अशी प्रतिक्रिया खा.बजरंग सोनवणे यांनी व्यक्त केली.

------------

### बीड जिल्ह्यात विमानतळ करण्यासाठी

असल्याने त्यांचे सर्वत्र कौतूक होत आहे. यावेळी संसदेत बोलताना खा. सोनवणे म्हणाले, बीड मतदार संघाच्या बाजूला १३० किलोमीटरवर संभाजीनगर आहे. बाजूला लातूर आहे. त्या ठिकाणी विमान तळाच्या सुविधा उपलब्ध आहेत. तर जिल्ह्यापासून ५०० कि.मी. अंतरावर पुणे शहर आहे. सध्या कमी वेळेत दुसऱ्या शहरात जाण्यासाठी विमान सेवा हाच पर्याय आहे. बीड जिल्ह्यातील दररोज बरेच नागरीक विमान प्रवास करतात. त्यांना संभाजीनगर, लातूर आणि पुणे येथे जावे लागते. यावेळी वेळ आणि पैसाही खर्च होत असल्याने नागरीकांची गैरसोय होत आहे. त्यामुळे बीड येथे विमानतळ मंजूर करुन ते लवकरात लवकर उभारण्यात यावे अशी मागणी खा. बजरंग सोनवणे यांनी संसदेत केली आहे. विकास हा मुंबई आणि मोठ्या महानगरांमध्येच का? आमच्याकडेही हा विकास येऊ द्या! आमच्या शेतकऱ्यांचाही मोठा फायदा यात होईल. पुण्यात इंटरनॅशनल एअरपोर्ट करण्याची घोषणा झाली. ती हवेतच विरली. त्याबाबतीतही निर्णय झाला पाहिजे, अशी मागणी खा. सोनवणे यांनी केली.

------------

### राज ठाकरे आज

यंदाच्या विधानसभा निवडणुकीत मनसेची भूमिका महत्वाची असणार आहे. लोकसभा निवडणुकीआधी राज ठाकरे यांनी महायुतीला पाठिंबा जाहिर केला. मात्र आता नुकत्याच झालेल्या मनसेच्या मेळाव्यात मात्र राज ठाकरे यांनी मनसे महाराष्ट्रात विधानसभेच्या २५५- २५० जागा लढवणार असल्याचे जाहिर केले आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज ठाकरे यांनी महाराष्ट्र दौरा सुरु केला आहे. दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात मनसे अध्यक्ष राज ठाकरे सोलापूरनंतर मराठवाडा दौऱ्यावर आहेत. सोलापूर, धाराशिव, नांदेड ,लातूर, हिंगोली, परभणी नंतर शुक्रवारी (दि.९) राज ठाकरे यांचे दुपारी १२ वाजता माजलगाव मार्गे बीड जिल्ह्यात आगमन होणार आहे.१ वाजता बीड शहरातील हॉटेल अन्विता येथे राज ठाकरे यांचे आगमन होईल. यानंतर राज ठाकरे जिल्ह्यातील पदाधिकारी, कार्यकर्त्यांची बैठक घेऊन विधानसभा मतदारसंघनिहाय आढावा घेणार आहेत. सायंकाळी मनसेच्या संपर्क कार्यालयाचे उदघाटन ठाकरे यांच्या हस्ते होणार असून ते बीड येथे मुक्कामी राहणार आहेत. शनिवारी (दि.१०) सकाळी ते जालन्याकडे रवाना होतील, अशी माहिती मनसे जिल्हाध्यक्ष सुमंत धस, राजेंद्र मोटे, श्रीराम बादाडे, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा वर्षा जगदाळे यांनी दिली.

-----------

### काँग्रेस नेते उद्यापासून

तसेच दि. १२ ऑगस्ट रोजी छत्रपती संभाजीनगर येथे, छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्हा काँग्रेसची बैठक घेऊन आढावा घेतला जाणार आहे. दि. १३ ऑगस्ट रोजी विदर्भात बुलढाणा येथे बुलढाणा, अकोला आणि वाशिम, दि.१४ ऑगस्ट रोजी अमरावती येथे अमरावती, यवतमाळ जिल्ह्याची बैठक घेऊन आढावा घेतला जाणार आहे, अशी माहिती प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे यांनी दिली.

-------------

### गुगल पे, फोन पे पेमेंट

किंवा फेस स्कॅन करून ऑनलाइन पेमेंट करू शकतील. आयफोन डिव्हाइस अनलॉक करण्यासाठी फेस स्कॅन करावे लागते त्याचप्रमाणे ऑनलाइन पेमेंट करता येईल.

**ऑनलाइन फ्रॉडला आळा घालण्यासाठी आवश्यक**

रिझर्व्ह बँकेच्या म्हणण्यानुसार, पिन पासवर्डमुळे अनेक ऑनलाइन फ्रॉड होत आहेत. अशा तऱ्हेने रिझर्व्ह बँकेला ऑनलाइन पेमेंटची चिंता सतावत आहे. यामुळेच आरबीआयने बँकांना इतर पर्याय शोधण्यास सांगितले. पिन बेस्ड मोबाइल पेमेंट करून ३ वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. रिपोर्टनुसार, एनपीसीआयकडून येत्या ३ महिन्यांत बायोमेट्रिक आधारित यूपीआय पेमेंट सुरू केले जाऊ शकते. त्यासाठी एनपीसीआयकडून तयारी सुरू करण्यात आली आहे.

----------

### जगभरातील आपत्ती निरीक्षणासाठी

सकाळी ९ वाजून १७ मिनीटांनी श्रीहरिकोटा येथून प्रक्षेपित केला जाईल. देश आणि जगाला आपत्तीचा माहिती अवगत होण्यासाठी ईओएस-८ उपग्रह मदत घेतली जाणार असल्याचे इस्त्रोच्या वतीने सांगण्यात आले. हा उपग्रह एसएसएलव्ही-विकास प्रकल्पांतर्गत आहे. भारतीय उद्योग आणि न्यूस्पेस इंडिया लिमिटेड (एनएसआयएल) द्वारे संचालित एक मिशन आहे. ईओएस-०८ मध्ये तीन पेलोड आहेत इलेक्ट्रो ऑप्टिकल इन्फ्रारेड पेलोड, ग्लोबल नेव्हिगेशन सॅटेलाइट सिस्टम-रिफ्लेक्टोमेट्री पेलोड, आणि एसआयसी-यूव्ही डोसिमीटर. एसएसएलव्ही-डी-३/बीएल-३५८ प्रक्षेपण वाहनासह उपग्रह इंटरफेस आहे. तर यामध्ये मिड-वेव्ह आयआर (एमआयआर) आणि लाँग-वेव्ह आयआर (एलडब्ल्यूआयआर) बँड आहेत. ईओआयआर दिवस आणि रात्र दरम्यान मध्य आणि लांब लहरी इन्फ्रारेड प्रतिमा घेण्याची पूर्ण क्षमता आहे. आपत्ती निरीक्षण, पर्यावरण निरीक्षण, आग शोधणे, ज्वालामुखी क्रियाकलाप इत्यादी क्रियाकलापांचे निरीक्षण करेल आणि सूचना देईल. मिशन दिवस आणि रात्र दोन्ही ऑपरेट करण्यासाठी डिझाइन केले आहे. यात ईओआयआरच्या मदतीने इन्फ्रारेड छायाचित्रे काढण्याची क्षमता आहे. या छायाचित्रांमधून देशातील आणि जगातील आपत्तींची माहिती उपलब्ध होणार आहे. आपत्तींमध्ये जंगलातील आग, ज्वालामुखीचा उद्रेक, समुद्रातील खळबळ, समुद्राच्या पृष्ठभागावरील वारा, जमिनीतील ओलावा आणि पूर इत्यादींचा समावेश होतो. यामध्ये, एसआयसी यूव्ही डोसमीटरने अल्ट्राव्हायोलेट रेडिएशन देखील शोधले जाऊ शकते, जे गगनयान मोहिमेत इस्रोला मदत करेल असे इस्रोने सांगितले.

-----------

### हॉकी संघाने जिंकले

लागला. हार्दिकने लगेचच व्हिडिओ रेफरल मागितला. त्यावर रेफरींनी भारताला पेनल्टी कॉर्नर दिला. याचा फायदा घेत कर्णधार हरमनप्रीत सिंगने संघासह वैयक्तीक दुसरा गोल नोंदवला. त्याचा स्पर्धेतील हा १० वा गोल ठरला. आणि भारताने २-१ अशी आघाडी घेतली. स्पेनला ३५ व्या मिनिटाला पेनल्टी कॉर्नरही मिळाला, पण भारताचा अमित रोहिदासने शानदार बचाव करत गोलचा धोका टळला. ३५ व्या मिनिटाला अभिषेकला ग्रीन कार्ड मिळाले आणि तो २ मिनिटांसाठी मैदानाबाहेर गेला. पुढे भारताला ३७ व्या आणि ४४ व्या मिनिटाला पेनल्टी कॉर्नर मिळाले. पण स्पॅनिश गोलकीपरने उत्तम बचाव करत भारताचे आक्रमण परतवून लावले. चौथ्या क्वार्टरमध्ये स्पेनने भारताची आघाडी मोडून काढण्यासाठी जोरदार प्रयत्न केले. यादरम्यान त्यांनी अनेकवेळा भारताच्या डी-मध्ये धडका देखील मारल्या. भारताच्या सुखजित सिंगला सामन्याच्या ५३ व्या मिनिटाला कार्ड दाखवण्यात आले, ज्यामुळे त्याला दोन मिनिटांसाठी मैदानाबाहेर जावे लागले. सामन्याच्या ५९ व्या मिनिटाला स्पेनला पेनल्टी कॉर्नर मिळाला, पण गोलरक्षक पीआर श्रीजेशने पुन्हा संकटमोचक ठरला आणि त्याने गोल वाचवला.

----------

### हिजाब बंदी : विद्यार्थीनी थेट

चालू शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीपासून हिजाब, नकाब, बुरखा, स्टोल तसेच टोपी परिधान करुन येण्यास प्रतिबंध घातला होता. महाविद्यालय प्रशासनाचा निर्णय धर्माचे पालन करण्याचा मुलभूत अधिकार तसेच गोपनियतेच्या अधिकाराचे उल्लंघन करतो, असे याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे. ॲड. ए. झैदी हे याचिकाकर्त्यांची बाजू मांडणार आहेत. सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड, न्यायमूर्ती जे. बी. पारदीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी होणार आहे.

-------------

### पश्चिम बंगालचे माजी मुख्यमंत्री

गेल्या वर्षी त्यांना न्यूमोनिया झाल्याने लाईफ सपोर्टवर ठेवावे लागले होते. त्यातून ते बरे झाले होते. पण गुरूवारी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात पत्नी मीरा आणि मुलगा सुचेतन असा परिवार आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार दि. ९ ऑगस्ट २०२४


## शुक्रवारी 'घरो घरी तिरंगा' या उपक्रमातंर्गत तिरंगा रॅलीचे आयोजन

बीड : स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर मागील काही वर्षांपासून घरो घरी तिरंगा हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यातंर्गत उद्या शुक्रवारी तिरंगा रॅली चे आयोजन छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण येथुन करण्यात येत आहे.राज्यभर घरोघरी तिरंगा उपक्रम राबविण्यात येत असून या अतंर्गत बीडमध्ये शुक्रवारी सकाळी १०:३० वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण येथुन या उपक्रमाचा शुभारंभ होणार असून ही रॅली पुढे कारंजा-भाजीमंडई मार्ग-छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल यामार्गास जाणार आहे.

घरो घरी तिरंगा या उपक्रमाअंतर्गत तिरंगा रॅली , तिरंगा मॅरेथॉन, तिरंगा सांस्कृतिक कार्यक्रम, तिरंगा कॅनव्हास, तिरंगा प्रतिज्ञा, तिरंगा सेल्फी, तिरंगा सेल्फीज, तिरंगा ट्रिब्युट, तिरंगा मेळा असे उपक्रम राबविण्यात येणार आहे. या तिरंगा रॅलीमध्ये बीडच्या नागरीकांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन जिल्हा प्रशासनाने किया केले आहे.

# गेवराई मतदार संघातून बदामराव पंडित हेच महाविकास आघाडीचे आमदार होतील-जाधव

**गेवराई । प्रतिनिधी**

**गेवराई विधानसभा मतदारसंघात गेल्या ३० वर्षापासून माजी राज्यमंत्री बदामराव पंडित सामान्य जनतेमध्ये मिसळून त्यांची कामे करत आहेत. विकास कामासोबतच सामान्य माणसांची वैयक्तिक कामे केल्यानेच ते पुन्हा एकदा गेवराई विधानसभा मतदारसंघात शिवसेनेचे महाविकास आघाडीतील आमदार म्हणून विजय होतील असा ठाम विश्वास शिवसेना बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव यांनी व्यक्त केला आहे.**


शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रभर भगवा सप्ताह उपक्रम राबविण्यात येत आहे. दिनांक ७ ऑगस्ट २०२४ रोजी गेवराई येथे झालेल्या शिवसैनिकांच्या विराट मेळाव्यात जाधव बोलत होते. कार्यक्रमास माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, शिवसेना जिल्हा समन्वयक बाळासाहेब अंभुरे, जिल्हा समन्वयक युधाजित पंडित, जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, महिला आघाडी जिल्हाप्रमुख संगीताताई चव्हाण, युवानेते रोहित पंडित, माजी सभापती अभयसिंह पंडित, युवानेते यशराज पंडित, ॲड एम एस इंदानी, माजी सभापती पंढरीनाथ लगड, बीड तालुकाप्रमुख गोरख सिंघम, महिला आघाडी उपजिल्हाप्रमुख शेख फर्जना, उपजिल्हाप्रमुख बबलू खराडे, तालुकाप्रमुख अजय दाभाडे किसान सेना तालुकाप्रमुख सतीश सपकाळ, युवासेना तालुकाप्रमुख गोविंद दाभाडे, शहर प्रमुख शेख शहेदाद, युवती सेनेच्या सिद्धेश्वरी कोकाटे, आदींची उपस्थिती होती. याप्रसंगी माजी जि प सदस्य युवराज डोंगरे, माजी सभापती अभयसिंह पंडित,



माजी तालुकाप्रमुख कालिदास नवले, युवासेना उपजिल्हाप्रमुख शेख सिराज, तय्यब पठाण, दत्ता राठोड, नारायण गाडे, संगीताताई चव्हाण, गणेश वरेकर यांची समायोजित भाषणे झाली. यावेळी बोलताना माजी राज्यमंत्री बदामराव पंडित म्हणाले की, गेल्या ३० वर्षापासून गेवराई विधानसभा मतदारसंघात प्रत्येक व्यक्तीचे माझ्याकडे आलेले कोणतेही काम गट न पाहता मी केले आहे. तालुक्यातल्या सर्व जाती-धर्माच्या लोकांसोबत राहत असल्याने एकमेकांची सुखदुःख आम्हाला माहिती आहेत. त्यामुळेच गेवराई तालुक्यातील प्रत्येकाशी माझे जिव्हाळ्याचे संबंध आहेत. या प्रेमावरच तीन वेळेस आमदार झालो. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रीपदाच्या काळात केलेली सामान्य जनतेच्या हिताची कामे आणि ३० वर्षात मी केलेली सामाजिक आणि विकासाची



कामे या बळावर पुन्हा एकदा गेवराई विधानसभा मतदारसंघावर यावेळी शिवसेनेचा भगवा फडकेल असा विश्वास बदामराव पंडित यांनी व्यक्त करून प्रत्येक शिवसैनिकाने घराघरात जाऊन प्रत्येक व्यक्तीची भेट घेऊन पक्षाचे मशाल चिन्ह त्यांच्यापर्यंत पोहोचवावे असे आवाहन केले. जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव म्हणाले की, गेल्या पंचवार्षिक निवडणुकीत काय झाले याचा विचार आता करत बसू नका. यावेळी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी कोणत्याही स्थितीत बदामराव पंडित यांना उमेदवारी देण्याचे जाहीर केले आहे. त्यामुळे त्यांना आमदार करण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्न करावेत. त्यांना नामदार करण्याची जबाबदारी शिवसेनेची आहे, असा विश्वास त्यांनी शिवसैनिकांना दिला. बीड जिल्ह्यात गेवराई तालुका हा शिवसेनेचा बालेकिल्ला आहे आणि तो या विधानसभेमध्ये बदामराव पंडित यांना आमदार करून महाराष्ट्राला दाखवून द्या असेही आवाहन जाधव यांनी केले. शिवसैनिकांच्या या मेळाव्यास माजी जी प सदस्य शामराव राठोड, माजी उपनगराध्यक्ष अमोल करांडे, सुभाष छाजेड, अश्विनी कोकाटे, तुकाराम हराळे, संभाजीराव येवले, प्रशांत मोरे, हरिभाऊ गलधर, मुकुंद बाबर, गोविंद जोशी, धनेश्वर खेत्रे, रामजी बांड, बाबा फटांगडे, राम काळे, तुळशीराम गलधर, दीपक रडे, राजू चव्हाण ,इजहार शेठ, हरभट शेठ, शेख शामदभाई, सोपानराव जाधव, पवन चव्हाण, शेख इस्माईल, रोहिदास लोखंडे, साईनाथ सुतार, गणेश लाड, भैय्या नाईकवाडे, चंद्रसेन जाधव, अंकुश झिंगरे, भारत मडके, प्रकाश तळेकर, सिताराम गव्हाणे, मोहन चाळक, नितीन साबळे, राजेंद्र खिस्ते, मधुकर आहेर, अजय औटी, महादेव औटी, कैलास राठोड, कल्याण राऊत, विशाल थोरात, गणेश चव्हाण, शिवाजी मोघे, रमेश फलके, पिंटू गर्जे, सुभाष घाडगे, बिभीषण पवार, संभाजीराव आहेर, भास्करराव कचरे, बदाम पौळ, संभाजी नाटकर, संतराम काळे, बंडू आप्पा घोलप, नंदू गाडे, विष्णू सोनवणे, नासेर अत्तार, फत्ते मामू, उज्वल सुतार, अजित वर्मा, काशिनाथ आडगळे, शेख फिरोज, जगन्नाथ गीते, राम शिंदे, बाळासाहेब नागटिळक, कैलास शिंदे, वसंत निकम, मिलिंद वाघमारे, राजू जावळे, दादासाहेब संत, दत्ता खरात, दादासाहेब खरात, कॅप्टन गिरी, आदींसह शिवसैनिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. माजी सभापती पंढरीनाथ लगड यांनी सर्वांचे आभार मानले.



**गेवराई : ढालेगाव गेवराई ते चाकरवाडी पायी दिंडीतील आयोजका कडुन ह.भ.प. महादेव महाराज चाकरवाडी येथे स्वागत करुन आशिर्वाद घेतले यावेळेस माऊली ग्रुपचे अंबादास गिरी,जगदाळे,चौरे,शेवाळे,माऊली वादे आदी उपस्थित होते.**

## संभाजीनगर येथे आयोजित आक्रोश मेळाव्यात सामील व्हा- माजलगाव प्रहार जनशक्तीचे आवाहन

दिंद्रुड प्रतिनिधी

प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष दिव्यांग कल्याण मंत्रालयाचे अध्यक्ष आमदार बच्चुभाऊ कडू यांच्या नेतृत्वाखाली विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे दिव्यांग, विधवा महिला, शेतकरी, शेतमजूर यांच्या विविध मागण्यांसाठी होणाऱ्या भव्य आक्रोश मोर्चासाठी माजलगाव तालुक्यातील सर्व दिव्यांग बांधव शेतकरी शेतमजूर व प्रहार च्या सर्व कार्यकर्ते यांनी हजारोच्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान प्रहार पक्षाचे बीड तालुकाध्यक्ष रमेश चव्हाण उपाध्यक्ष विकास काटकर यांनी प्रसिद्धी पत्राद्वारे केले आहे.

९ ऑगस्ट रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी दिव्यांगाच्या मानधनात वाढ करून ते ६००० रुपये करण्यात यावे. विनाअट घरकुल देण्यात यावे,भूमिहीन दिव्यांगाना एक गुंठा जागा देण्यात यावी सरकारी जागेमध्ये व्यवसायासाठी जागा उपलब्ध करून द्यावी यासह शेतकरी शेतमजूर विविध मागण्यासाठी आमदार बच्चुभाऊ कडू यांच्या नेतृत्वाखाली भव्य दिव्य असे आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात येत असून महाराष्ट्रातील सुमारे तीन ते चार लाख कार्यकर्ते आंदोलनामध्ये सहभागी होतील त्यामध्ये बीड जिल्ह्यातील सहभाग मोठ्या प्रमाणात असावा याकरिता बीड जिल्ह्यातील प्रहार चे कार्यकर्ते दिव्यांग बांधव विधवा परितक्त्या महिला शेतकरी शेतमजूर यांनी लाखोच्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन प्रहार पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष विलास काळुंके, माजलगाव तालुकाध्यक्ष रमेश चव्हाण, उपाध्यक्ष विकास काटकर यांनी केले आहे.

## कवी डॉ.संजय मोहड यांना महाकवी वामनदादा कर्डक राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

**बीड । प्रतिनिधी**

महाकवी वामनदादा कर्डक यांच्या जयंतीनिमित्त नालंदा फाउंडेशन बीड यांच्या वतीने प्रतिवर्षी दिला जाणारा महाकवी वामनदादा कर्डक राज्यस्तरीय पुरस्कार डॉ.संजय मोहड प्रोफेसर आणि संगीत विभाग प्रमुख, स.भु. कला व वाणिज्य महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना जाहीर करण्यात आला असल्याची माहिती संयोजन समितीच्या वतीने देण्यात आली आहे.



नालंदा फाउंडेशन बीड यांच्या वतीने सामाजिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या व्यक्तींना त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल दरवर्षी महाकवी वामनदादा कर्डक राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. यावर्षीचे मानकरी प्रो.डॉ.संजय मोहड हे आहेत. त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांचा यथोचित सत्कार नालंदा फाउंडेशन बीड यांच्या वतीने करण्यात येणार आहे.या पुरस्काराचे स्वरूप २५ हजार रुपयांचा धनादेश, स्मृति चिन्ह, सन्मानपत्र असे आहे.

प्रो.डॉ.संजय मोहड यांनी फुले-शाहू- आंबेडकर विचारांची पेरणी करत आपल्या साहित्याच्या माध्यमातून त्यांची विचारधारा जनमानसात पोचवण्याचे कार्य केले आहे. त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत नालंदा फाउंडेशन बीड यांच्या वतीने १५ ऑगस्ट २०२४ रोजी सायंकाळी ६ वाजता यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड येथे नालंदा फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रा.प्रदिप रोडे यांच्या हस्ते महाकवी वामनदादा कर्डक राज्यस्तरीय पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात येणार आहे. अशी माहिती संयोजन समितीच्या वतीने देण्यात आली आहे.

## जिल्ह्याच्या ११ ब्लॉकसाठी जवाहर नवोदय विद्यालयाची परीक्षा १८ जानेवारी रोजी

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्याच्या अकरा ब्लॉगसाठी जवाहर नवोदय विद्यालयाची परीक्षा १८ जानेवारी २०२५ ला होणार आहे. यासाठी पालकांनी त्यांच्या पाल्यांसाठी अर्ज करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

ग्रामीण भागातील मुला-मुलींना गुणात्मक आणि आधुनिक शिक्षण मिळावे यासाठी जवाहर नवोदय विद्यालय समितीची स्थापना करण्यात आली असून या अंतर्गत सामाजिक मूल्य पर्यावरण जागृती शारीरिक शिक्षण यासारख्या महत्त्वाच्या घटकांचा समावेश करून ग्रामीण भागातील हुशार मुलींना त्यांच्या कुटुंबाची आर्थिक व सामाजिक स्थिती विचारात न घेता संपूर्ण देशात समान स्तरावर इंग्रजी व हिंदी माध्यमातून शिकविण्याची सुविधा उपलब्ध आहे. नवोदय विद्यालयात प्रवेशासाठी प्रवेश परीक्षा घेतली जाते. या निवासी शाळा आहेत. ज्या केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत जवाहर नवोदय विद्यालय समिती मार्फत चालविल्या जातात. बीड जिल्ह्यातील अकरा ब्लॉक लसाठी पुढील वर्षाच्या १८ जानेवारी २०२५ ला यासाठी प्रवेश परीक्षा होणार असून यामध्ये अधिकाधिक विद्यार्थ्यांनी परीक्षा देऊन या परीक्षेत पात्र व्हावे असे आवाहन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी केले आहे.

## चिखलीचे प्रगतशील शेतकरी बबनदादा शिंदे यांच्या ड्रॅगन फ्रुट फळबागेला भेट

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील चिखलीचे प्रगतशील शेतकरी बबनदादा शिंदे यांच्या ड्रॅगन फ्रुट फळबागेला तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे वा पत्रकारांनी भेट दिली.चिखली येथे जागृत देवस्थान महालक्ष्मी यात्रेनिमित्त दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी प्रगतशील शेतकरी बबनदादा शिंदे यांच्या राजे संभाजी उद्योग समूहाचे स्नेहभोजनचा कार्यक्रम संपन्न झाला. यानिमित्ताने आष्टी तालुक्यातील चिखली येथील शेतीनिष्ट शेतकरी 'समाजसेवक' बबनदादा शिंदे यांच्या ड्रॅगन फ्रुट फळबागेला तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे,कृषी सहाय्यक यांनी

भेट देऊन फळबागेची पाहणी केली यावेळी युवा नेते शाम धस,राजे संभाजी उद्योग समूहाचे संचालक अमोलराजे शिंदे,महेश





हंबर्डे,उत्तम बोडखे,प्रवीण पोकळे, शरद रेडेकर,रघुनाथ कर्डीले ,शरद तळेकर, संतोष सानप,सचिन रानडे यांच्यासह आदि विविध क्षेत्रातील मान्यवर, शेतकरी,ग्रामस्थ उपस्थित होते.

पान ६ वरून...

## जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते

महाद्वार, वडवणी तालुका प्रमुख विनायक बप्पा मुळे, शिरूर तालुका प्रमुख सोपान काका मोरे, शिवसेना जिल्हा सह सचिव युवराज मामा शिंदे,बीड शहर प्रमुख शेख निजाम यांच्या उपस्थितीत बीड जिल्हा जनसंपर्क कार्यालय बार्शी रोड बीड येथे वाढदिवस साजरा करुन सर्व शिवसेनेचे पदाधिकाऱ्यांनी व शिवसैनिकांनी शुभेच्छा दिल्या व सायंकाळी पिंपळनेर मध्ये गणेश दादा पटाईत, सुभाष शेठ चरखा व त्यांच्या सहकाऱ्यांनी शुभेच्छा दिल्या.जगदंबा पेट्रोलियम येथे पिंपळनेर सर्कल व बाभळवाडी गावातील कारभारी वीर,सुंदर शेवाळे, राघुजी आण्णा सातपुते,अशोक नाना सातपुते, शिवाजी निर्धार,रामेश्वर सातपुते सर, लक्ष्मण सातपुते,कल्याण सर,केरबा मातकर, सतीश नाना चिंचकर, काशीनाथजी पवार, युवा नेते अश्विन लांडे सह सर्व ग्रामस्थांनी व तरूण मित्रांनी भव्य वाढदिवस साजरा करुन शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी बोलताना शिवसेना पक्षामध्ये काम करीत असताना पक्षप्रमुख माननीय बाळासाहेब ठाकरे यांनी आखून दिलेल्या ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण या शिकवणीप्रमाणे यापुढेही सामाजिक कार्यात माझा नेहमी पुढाकार राहील व गोरगरीब गरजू यांच्या मदतीला नेहमीच मी शिवसेनेच्या माध्यमातून पुढे राहणार आहे व मान्यवरांनी दिलेल्या शुभेच्छा व आशीर्वादामुळे कार्य करायला बळ मिळते. काल माझ्या वाढदिवसानिमित्त आध्यात्मिक,राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी, त्याचप्रमाणे शिवसेना परिवारातील सर्व मान्यवर व सहकारी,मिडीयाचे प्रतिनिधी,सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी, शेतकरी प्रतिनिधी, डॉक्टर, इंजिनिअर, वकील, शिक्षक,मित्र,आप्तेष्ट, जेष्ठ, युवा, लहान थोर सर्वच क्षेत्रातील मान्यवरांनी मला मनपूर्वक शुभेच्छां रूपी आशीर्वाद दिले, सोशल मीडिया, फोन प्रत्यक्ष भेटून असंख्य सहकार्यांनी अगदी मनापासून शुभेच्छा दिल्या, त्यामुळे मी अगदी भारावून गेलो परंतु त्यांच्या अगणीत शुभेच्छामुळे मला पुन्हा एकदा लढण्याचे बळ मिळाले, प्रेरणा उर्जा मिळाली, सर्वांनी दिलेल्या शुभेच्छांचा मी मनपूर्वक स्वीकार करतो व आपल्या शुभेच्छा कायम स्मरणात राहतील. त्यामुळे आपल्या शुभेच्छारुपी प्रेमातून उतराई होण्याची शक्ती आई जगदंबेने देवो हीच सदिच्छा...

## वाघिरा महोत्सवात रंगणार कुस्त्यांची दंगल

बीड । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील वाघीरा येथे परिसरातील ग्रामदैवत असलेल्या वै.गुरुवर्य श्री संत सिताराम बाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त दरवर्षी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन ग्रामस्थांच्या वतीने करण्यात येते. या निमित्ताने वाघिरा महोत्सवाचे आयोजन बजरंग क्रीडा मंडळ व व्यायाम शाळा यांच्या वतीने करण्यात येते. यावर्षी वार शनिवार दिनांक १० ऑगस्ट रोजी २०२४ दुपारी ३ ते ६ या वेळेत जंगी कुस्त्यांचे आयोजन करण्यात आलेले आहे.

१० रुपये पासून ५००० रुपये पर्यंत रोख स्वरूपात बक्षीस दिले जाणार आहे.

श्री संत सिताराम बाबा यांच्या पुण्यतिथी निमित्त पाटोदा तालुक्यातील वाघीरा येथे ३ ऑगस्ट ते १० ऑगस्ट या कालावधीमध्ये अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहाची सांगता शनिवार दिनांक १० ऑगस्ट रोजी ह भ प श्री महंत श्रीनिवास महाराज आळंदी देवाची यांचे अमृततुल्य



असे काल्याचे कीर्तन व महाप्रसाद झाल्यानंतर, दुपारी ३ ते ६ वाजता १० रुपये पासून ते ५००० हजार रुपये पर्यंत कुस्त्यांची दंगल रंगणार आहे. यामध्ये वाघिरा, बालाघाटावरील व पंचक्रोशीतील नामांकित मल्लांचा सहभाग राहणार आहे. बजरंग क्रीडा मंडळाने गेल्या २३ वर्षापासून या सांस्कृतिक बलोपासनेच्या महोत्सवाची सातत्य पूर्ण जोपासना केली आहे. दिनांक १० ऑगस्ट रोजी कुस्त्यांचे उद्घाटक म्हणून संस्थापक अध्यक्ष हरिभाऊ बांगर हे राहणार आहेत, प्रमुख पाहुणे म्हणून श्री सर्जेराव तांदळे बीड जिल्हा सरचिटणीस भा ज पा., श्री नितीन कोटेचा उद्योगपती बीड, विजय नागरगोजे शिक्षण महर्षी, श्री भगवान बप्पा बांगर उद्योगपती, ऍड नरसिंग जाधव, श्री अबलुक घुगे युवा नेते पाटोदा, उपस्थिती जिल्ह्यातील क्रिडा मंडळे, व्यायामशाळा आणि बजरंग क्रिडा मंडळाचा मित्र परिवार यांना आग्रहाचे निमंत्रण देण्यात येत आहे.

राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत सन २०२३ कांस्य पदक विजेता पै.विलास वाघमारे, पै.वैजनाथ बांगर यांची वनपाल पदावर पदोन्नती, श्री अजिंक्य बांगर राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड २०२४ आणि १७ वर्षाखालील राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी झालेले बजरंग क्रिडा मंडळाचे व बीड जिल्हा रग्बी असोसिएशनचे खेळाडू कु.रांजवण सुप्रिया भरत, कु.किरण जयराम गर्जे, कु.शितल सुभाष आरगुडे यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल यांना क्रीडा मंडळातर्फे सन्मानित करण्यात येणार आहे*.

या महोत्सवाचा वाघीरा पंचक्रोशीतील, बालाघाटावरील, जिल्हा वासीयांनी लाभ घ्यावा, असे आवाहन बजरंग क्रीडा मंडळाचे संस्थापक अध्यक्ष हरिभाऊ बांगर, उपाध्यक्ष बिबीशन बांगर, डॉ लक्ष्मण विघ्ने, उद्धव बावणे(उद्योजक), वैजनाथ बांगर (राष्ट्रीय खेळाडू),प्रा. महेश घुले (राष्ट्रीय खेळाडू), शिवाजी गोपळघरे ( फिटनेस गुरू), फुलचंद बांगर(शिवछत्रपती परस्कार प्राप्त) ज्ञानेश्वर भोसले (उद्योजक) सुंदर बांगर(उद्योजक) भाऊसाहेब बांगर(उद्योजक), कुंडलिक बांगर(राष्ट्रीय खेळाडू),विलास वाघमारे(राष्ट्रीय खेळाडू), डॉ सुरज बंगर, डॉ महेंद्र बांगर, डॉ विकास नागरगोजे,डॉ पवन बांगर, जयराम बांगर, श्रीकृष्ण बांगर (म.पो.), अजिनाथ बांगर, गणेश बावणे, अजिंक्य बांगर, अमर बांगर, रवींद्र बांगर,अजिंक्य बांगर, यांनी केले आहे.

## जाहीर प्रगटन

मा. श्रीमती टी. ए. आसरकर ३ रे सह दिवाणी न्यायाधीश का स्तर बीड यांच्या न्यायालय

किरकोळ दिवाणी अर्ज ८३२/२०२४ शौकत व ईतर विरुद्ध निरंक

ॲड. एस. एस. महाजन

अर्जदार : १) शौकत शब्बीर पठाण, वय ६२ वर्ष, धंदा शेती पत्ता- खामगांव ता. जि. बीड २) सादिका अहेमद शेख, वय ७५ वर्ष, धंदा घरकाम आहेर वाहेगांव ता. गेवराई जि. बीड

विरुध्द

**मागणी अर्जः बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत शब्बीरखॉ महेबुबखॉ पठाण यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत शब्बीरखॉ महेबुबखॉ पठाण यांचा मृत्यु दि. ३०/०५/२०२३ रोजी खामगाव, ता.जि. बीड येथे झाला आहे. अर्जदार ही मयताची आई आहे. मयत हा अविवाहीत होता.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे, त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत शब्बीरखॉ महेबुबाँ पठाण यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक १८ माहे जून २०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ३१/८/२०२४

**स्वाक्षरित/-**
**क. लिपीक**

**शिक्का**

**स्वाक्षरित/-**
**आदेशावरुन,**
**अधिक्षक दिवाणी न्यायालय**
**व स्तर, बीड**




# ३२ तासानंतर भारत-बांग्लादेश सीमेवर अडकलेले कांद्याचे ट्रक रवाना

पुणे : सोमवारी दुपारनंतर भारत-बांगलादेश सीमा बंद करण्यात आली होती. त्यामुळे रस्ते मार्गाने भारतातून जाणाऱ्या कांदा, द्राक्ष, टोमॅटो व अन्य कृषिमालांचे ट्रक हे सीमेवरच अडकून होते. सीमा बंद झाल्याने सर्व पीकांची निर्यात पूर्ण ठप्प झाली होती. दरम्यान, अखेर मध्यरात्री ३० ते ३२ तासानंतर सीमा खुली झाली आणि कागदपत्रांची छाननी करून या ४० कांद्याच्या ट्रक बांगलादेशला पाठवण्यात आल्या असून, उर्वरित ट्रकही लवकरच मार्गस्थ होणार असल्याची माहिती समोर आली आहे.

गेल्या काही दिवसांपासून बांगलादेशमध्ये हिंसाचार सुरू असून, यामुळे बांगलादेशच्या पंतप्रधानांनी आपल्या पदाचा राजीनामा देत देशातून पळ काढत भारतात आश्रय घेतला. दरम्यान, यानंतर भारताने बांगलादेशसह आपल्या इतर सीमाही सील केल्याने भारतातून बांगलादेशात होणारी मालाची निर्यातही थांबवण्यात आली होती. त्यामुळे भारत-बांग्लादेश सीमेवर निर्यातीसाठी जाणाऱ्या कांद्यांचे शेकडो ट्रक अडकल्याचे वृत्त माध्यमांवर झळकले. त्यामुळे कांद्याचे जवळपास ७० ते ८० ट्रक हे सीमेवर अडकले होते. बांग्लादेश हा भारतीय



कांद्याचा प्रमुख खरेदीदार मानला जातो. सध्या महाराष्ट्रातून जवळपास ७५% कांदा हा बांग्लादेशमध्ये निर्यात होत आहे. निर्यातदार बांगलादेशात व्यापार करताना कुठलीही जोखीम पत्करत नाही. त्यामुळे तिकडे मालाची निर्यात करताना आगाऊ पैसे घेतले जातात, बँकांकडून 'बँक गॅरंटी' घेऊनच शेतमाल पाठवला जातो. हिंसाचारामुळे सध्या तेथील बँका बंद असून, दोन ते तीन दिवसात बँक सुरू होऊ शकतात. त्यामुळे बांग्लादेशमधील एकूणच हिंसाचाराची आणि सीमेवरील परीस्थिती लक्षात घेत निर्यातदारांनी तूर्तास बांग्लादेशला नव्याने माल न पाठवण्याचा निर्णय घेतल्याचे समजते. तर, बँकांचे कामकाज सुरळीत झाल्यानंतर कांदा किंवा इतर मालाची निर्यात ही पूर्ववत होण्याची शक्यता आहे. भारतातून बांगलादेशात कांद्या व्यतिरिक्त सुती धागा, पेट्रोलियम उत्पादने, तांदूळ, सुती कपडे, सेंद्रिय आणि अजैविक रसायने यांची निर्यात होते.

०००

राजू शेट्टी यांचे पंतप्रधानांना पत्र

या प्रकरणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष तथा माजी खासदार राजू शेट्टी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहिले असून, यात ''बांगलादेशातील अस्थिर परिस्थितीमुळे भारत-बांगलादेशमधील दळणवळण ठप्प झाले असल्याने कांद्याची निर्यात थांबली आहे. बांगलादेशच्या या परिस्थितीचा कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात फटका बसत आहे. यामुळे केंद्र सरकारने या प्रकरणी हस्तक्षेप करावा आणि बांगलादेशच्या काळजीवाहू सरकारशी तातडीने बोलणी करुन देशातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्याची मागणी राजू शेट्टी यांनी केली.

## कोंबड्यांमध्ये आढळणारा जीवघेणा आजार 'पांढरा अतिसार'

ग्रामीण अर्थव्यवस्थेत कुक्कुटपालनाला विशेष महत्व आहे, कारण अनेक लोकांसाठी कमाईचे मुख्य साधन देखील आहे. कुक्कुटपालनात कोंबड्या आजारी पडल्याने या व्यवसायाला आणि पर्यायाने कुक्कुटपालकांना मोठ्या नुकसानीला सामोरे जावे लागते. असाच एक जीवघेणा आजार म्हणजे पांढरा अतिसार/जुलाब. या रोगाला पांढरी हगवण किंवा पुलोरम या नावाने सुद्धा ओळखतात.



पांढरा अतिसार रोग म्हणजे काय? : या आजारात कोंबड्यांच्या विष्ठेचा रंग पूर्णपणे पांढरा होतो आणि शौच करताना त्यांना खूप वेदना होतात. काही वेळा पांढऱ्या जुलाबाच्या आजाराने काही पक्षी आंधळे किंवा पांगळे होतात. जुलाबामुळे कोंबड्या आणि पिल्लांचा मागचा भागही चिकट होतो. पांढरा अतिसार किंवा जुलाब हा रोग प्रामुख्याने पिलांमध्ये होतो, यामुळे बहुतेक पिल्ले मरतात. नंतर हा रोग कोंबड्यांमध्ये पसरतो. या रोगाची लागण झालेल्या अंड्यांमधील भ्रूण मरतात.

पांढरा अतिसार रोग उपचार : कोणत्याही पशुवैद्यकीय दुकानात तुम्हाला पांढऱ्या अतिसाराचे औषध सहज मिळू शकते. कोंबड्या आणि पिल्लांनाही त्यांच्या डोसनुसार औषध द्यावे. जर तुम्ही ५ कोंबड्यांना किंवा २० पिलांना औषध देत असाल तर २ चिमूटभर औषध एका कप पाण्यात विरघळवून घ्या आणि आजारी पिलांना २-२ थेंब आणि कोंबड्यांना ५-५ थेंब सिरिंजद्वारे सलग तीन दिवस द्या. असे केल्याने डोस ओव्हरडोस होत नाही आणि त्यांचा आरामही लवकर येतो.

औषध देण्याची पद्धत : पांढऱ्या अतिसाराच्या आजारापासून मुक्त होण्यासाठी तुम्ही तुमच्या कोंबड्या किंवा पिल्लांना त्यांच्या पिण्याच्या पाण्यात विरघळवून औषध देऊ शकता. या पद्धतीने ४० पिल्ले किंवा १० कोंबड्या एका वाटीत पाण्यात सुमारे ४ चिमूटभर औषध विरघळवून कोंबड्याच्या घरात ठेवावे. हे औषध असलेले पाणी तुम्ही कोंबडीच्या पाण्याच्या भांड्यात सलग २ दिवस ठेवावे. याशिवाय, गरजेनुसार सुद्धा हे औषध असलेले पाणी प्रभावित पिलांना किंवा कोंबड्यांना पाजावे लागेल.

पांढरा अतिसार रोग प्रतिबंध : पांढऱ्या जुलाबाच्या आजारापासून कोंबड्यां आणि पिल्लांचे संरक्षण करण्यासाठी, तुम्ही कोंबड्याच्या घरामध्ये आणि आजूबाजूला स्वच्छता राखली पाहिजे. याशिवाय, कोंबड्यांना आणि पिलांना कमीत कमी प्रमाणात टेट्रासाइक्लिन पावडर/लिक्सेन पावडर/फुरासोल पावडर देऊन हा धोकादायक आजार टाळता येतो.

## मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी पीक विम्याकडे फिरवली पाठ

संभाजीनगर : सरकारने १ रुपयात पीक विमा योजना काढली असली तरी पीक विमा भरणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये मराठवाडा विभागात यावर्षी मोठ्या प्रमाणात घट झाल्याचे दिसून येत आहे. सरकारने दिलेल्या ३१ जुलैपर्यंतच्या मुदतीत ७७.४० लाख शेतकऱ्यांनी ४९.६७ लाख हेक्टर क्षेत्राचा पीक विमा काढला आहे. मागील वर्षी शेतकर्यांची संख्या ८०.४४ लाख होती. म्हणजे जवळपास शेतकऱ्यांच्या संख्येत ३ लाखांची घट झाली आहे.

पीक विमा मिळण्यास येणाऱ्या अडचणींमुळे यंदा शेतकऱ्यांनी योजनेची नोंदणीच न केल्याचं दिसून येत आहे. मागील वर्षीच्या तुलनेत या वर्षी ३.४४ लाख शेतकऱ्यांनी पीक विमा काढला नसल्याचे समोर आले आहे.



मराठवाड्यात मागील काही वर्षांत कधी दुष्काळ तर कधीकधी अतिवृष्टी यामुळे लागवडीचा खर्चही निघत नाही, अशी अवस्था होती. तर दुसरीकडे पीक विमा भरल्यानंतरही केवळ नुकसानाची माहिती दिली नसल्याचे कारण पुढे करीत विमा कंपन्यांकडून पीक विमा नाकारला जात होता. छत्रपती संभाजीनगर, जालना जिल्हा वगळता इतर ६ जिल्ह्यांमधून सोयाबीनचे पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. शासनाने १ रूपयामध्ये पीक विमा जाहीर केला. त्यानुसार मागील वर्षी मराठवाड्यातील ८०.८४ लाख शेतकऱ्यांनी पीक विमा भरला होता. मात्र अनेक ठिकाणी २१ दिवसांचा पावसाचा खंड या निकषावर बोट ठेवत विमा कंपनीने शेतकर्यांना पीक विमा दिला नाही, तर ज्या शेतकऱ्यांनी नुकसानीची माहिती विमा कंपनीला दिली त्या ठिकाणी केवळ २ ते ५ हजार रूपयांचाच विमा मंजूर केला आहे.

जिल्हा निहाय पीक विमा काढणारे शेतकरी : संभाजीनगर- ११,४०,८७६, बीड १७,१७,१७६, जालना ९,१३,९७७, धाराशिव ७,१९,१००, हिंगोली ४,७८,३३०, लातूर ८,८७,१३३, नांदेड ११,२०,८५४, परभणी ७,६३१४३ कृषी विभागाच्या माहितीनुसार, मागील वर्षी १ कोटी ७० लाख शेतकऱ्यांनी आपल्या पिकांचा विमा उतरवला होता. यावर्षी मात्र, यामध्ये घट झाल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. यावर्षी आतापर्यंत १ कोटी ५६ लाख शेतकऱ्यांनी विमा उतरवला आहे. पंतप्रधान खरीप पीक विमा योजनेत मागील वर्षी प्रमाणेच यावर्षी सुद्धा १ रूपयामध्ये पीक विमा उतरवण्याची संधी शेतकर्यांना देण्यात आली होती.

पीक विम्याकडे पाठ फिरवण्याची कारणे : मागील वर्षी पिकविम्यामध्ये अनेक गैरप्रकार उघडकीस आले होते. एका शेतकऱ्यांच्या जमिनीवर परस्पर दुसऱ्याने विमा काढणे, शासकिय जमिनीवर विमा काढणे, अकृषक क्षेत्रावरील पिकांचा विमा काढणे, मंदिर तसेच अन्य धार्मिक स्थळांवरील जमिनीवरील पिकांचा विमा काढणे, सार्वजनिक संस्थांच्या जमिनीवरील पिकांचा विमा काढणे, जास्त क्षेत्राचा विमा काढणे, सामायिक क्षेत्रावर परस्पर विमा उतरवणे, एकाच बँक खात्यावर अनेक शेतकर्यांचा विमा काढणे असे प्रकार उघडकीस आले आहेत. त्यामुळे यावर्षी पीक विमा योजनेतील शेतकर्यांची संख्या घटल्याचे दिसत आहे. यावर्षी या योजनेते १० लाख शेतकरी कमी होण्याची शक्यता आहे.


## ऑगस्टमध्ये करा या भाजीपाला पिकांची लागवड

ऑगस्ट महिन्यात अधिक नफा देणारी भाजीपाला पिके घेऊन उत्पन्न वाढवण्याची शेतकऱ्यांसाठी ही सुवर्णसंधी आहे. ऑगस्ट महिना हा विविध प्रकारची पिके लावण्यासाठी योग्य समजला जातो. विशेषतः भाजीपाला पिकातून अधिक उत्पन्न मिळू शकते. नवनवीन शेती तंत्राचा अवलंब करण्याचा कल वाढत असताना, जलद नफा मिळवणाऱ्यांसाठी भाजीपाला लागवड अधिक लोकप्रिय होत आहे.

फुलकोबी आणि कोबी : फुलकोबी आणि कोबी लावण्यासाठी ऑगस्ट हा उत्तम काळ आहे. महिन्याच्या सुरुवातीला रोपवाटिका तयार करून सुरुवात करा आणि ऑगस्टच्या मध्यापर्यंत रोपे लावा. ही पिके साधारणपणे ७० ते ८० दिवसांत परिपक्व होतात. बाजारातील त्यांची स्थिर मागणी लक्षात घेता, ते उत्तम कमाईची क्षमता ठेवतात. वाढ आणि उत्पन्न वाढवण्यासाठी तुमच्या भागात अनुकूल असलेल्या संकरित बियांची निवड करा.

भेंडी : फायद्याचे पीक घेऊ इच्छित शेतकऱ्यांसाठी ऑगस्टमध्ये लागवड केलेल्या उशिरा परिपक्व होणाऱ्या भेंडीच्या जाती नोव्हेंबरपर्यंत काढणीस तयार होतात, ज्यामुळे लक्षणीय नफा मिळतो. रोग आणि कीटकांचा धोका कमी करण्यासाठी, निरोगी आणि अधिक उत्पादनक्षम पीक सुनिश्चित करण्यासाठी संकरित बियाण्याची शिफारस केली जाते.

पालक : पालक ऑगस्टमध्ये वाढतो आणि जलद परतावा देतो . केवळ २५ ते ३० दिवसात तयार होतो, त्यामुळे जलद नफ्यासाठी हा एक उत्कृष्ट पर्याय आहे. पावसाळ्यात, तुमच्या पालकाला जास्त ओलाव्यापासून वाचवण्यासाठी गादी वाफा किंवा ''मेड'' पद्धत वापरा. घरचे बियाणे वापरत असल्यास, त्यांची उगवण क्षमता तपासून घ्यावी.



टोमॅटो : बाजारातील सातत्यपूर्ण मागणीमुळे टोमॅटो हे शेतकऱ्यांचे बारमाही आवडते पीक आहेत. रोपवाटिका तयार करून लागवड करा आणि ऑगस्टच्या सुरुवातीला बियाणे लागवड करता येते. सुमारे ६५ ते ७० दिवसांत पिकलेले टोमॅटो काढणीस तयार होतात. मुसळधार पावसाच्या परिणामांचा सामना करण्यासाठी, पाण्याचे नुकसान कमी करण्यासाठी आणि निरोगी झाडे सुनिश्चित करण्यासाठी मल्चिंग, गादी वाफा किंवा वेलींना आधार देणे या पद्धतींचा वापर करा.

मुळा : मुळा ऑगस्ट महिन्यात लागवडीसाठी एक उत्कृष्ट पीक आहे. पुसा चेटकी, सिंजेंटा आणि सोमाणी या जाती यावेळी लागवडीसाठी योग्य आहेत कारण या जाती जलद वाढतात आणि योग्य रित्या व्यवस्थापन केल्यास ते कमी कालावधीत भरीव परतावा देतात.

ग्रीन बीन्स किंवा फरसबी : ग्रीन बीन्स हे ऑगस्ट महिन्यात लागवडीसाठी आणखी एक उत्कृष्ट पीक आहे. ते झपाट्याने वाढतात आणि ५० ते ६० दिवसात काढता येतात. ग्रीन बीन्सची मागणी जास्त आहे, आणि ते विविध प्रकारच्या जमिनीमध्ये घेतले जाऊ शकते. ज्यामुळे ते एक बहुपयोगी आणि फायदेशीर पर्याय आहे. या पिकाचे जास्तीत जास्त उत्पादन घेण्यासाठी पिकाला योग्य आधार द्यावे आणि नियमित कापणी सुनिश्चित करा.

ढोबळी मिरची : ऑगस्टच्या उबदार हवामान ढोबळी मिरचीसाठी अनुकूल समजले जाते. पाण्याचा निचरा होणार्या जमिनीत रोपे लावून सुरुवात करा आणि त्यांची वाढ झाल्यावर पुरेसा आधार द्या. ढोबळी मिरची परिपक्व होण्यासाठी सुमारे ७० ते ८० दिवस लागतात आणि त्यांचे आकर्षक रंग आणि कुरकुरीत पोत यामुळे बाजारपेठेत त्यांना चांगली मागणी असते.

काळजीपूर्वक लागवड केल्यास शेतकऱ्यांना चांगला परतावा देऊ शकतात.

शेतकरी ऑगस्टच्या अनुकूल वाढीच्या परिस्थितीचा पुरेपूर फायदा घेऊन या सात पिकांवर लक्ष केंद्रित करून कृषी उत्पन्नात लक्षणीय वाढ करू शकतात. यातील प्रत्येक भाजी अद्वितीय फायदे देते आणि योग्य तंत्रे आणि योग्य व्यवस्थापनाने प्रभावी नफा मिळवून देऊ शकते.




### जागतिक दिवस:
### भारत छोडो दिवस, भारतीय ग्रंथालय दिन
### आंतरराष्ट्रीय भूमिपूत्र दिन

### महत्वाच्या घटना

११७३ : पिसाच्या मनोर्याचे बांधकाम सुरू झाले. हा मनोरा बांधण्यास २०० वर्षे लागली आणि चुकीने तो तिरका बांधला गेला.
१८९२ : थॉमस एडिसन यांना दुहेरी तार यंत्राचे पटेंट मिळाले.
१९२५ : चंद्रशेखर आझाद आणि त्यांच्या सहकार्यांनी काकोरी रेल्वेस्थानकावर सरकारी खजिना लुटला.
१९४२ : 'चले जाव' चा नारा दिल्याबद्दल महात्मा गांधींना अटक करण्यात आली.
१९४५ : अमेरिकेने जपानच्या नागासाकी शहरावर 'फॅटबॉय' हा अणूबॉम्ब टाकला. यात ३९,००० लोक तत्क्षणी म्रुत्यूमुखी पडले तर हजारो लोकांना पुढील अनेक वर्षे किरणोत्सर्गाचे परिणाम भोगावे लागले. प्रथम हिरोशिमा व नंतर नागासाकी या शहरांवर टाकलेल्या अणूबॉम्बमुळे जपानने शरणागती पत्करली आणि दुसरे महायुद्ध संपुष्टात आले.
१९६५ : मलेशियातुन बाहेर काढल्यामुळे सिंगापूर हा देश स्वतंत्र झाला. आपल्या इच्छेविरुद्ध स्वतंत्र झालेला हा जगातील एकमेव देश आहे.
१९७४ : वॉटरगेट प्रकरण अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन यांनी राजीनामा दिला.
१९९३ : छोडो भारत चळवळीच्या सुवर्णजयंती सांगतासमारंभानिमित्ताने 'सरहद गांधी' खान अब्दुल गफार खान यांच्या टपाल तिकिटाचे प्रकाशन
१९९३ : छोडो भारत चळवळीच्या सुवर्णजयंती सांगतासमारंभानिमित्ताने 'सरहद गांधी' खान अब्दुल गफार खान यांच्या टपाल तिकिटाचे प्रकाशन
१९७५ : पंतप्रधानांच्या विरुध्द कोर्टात जाण्यास मनाई करणारे विधेयक संसदेत मंजूर करण्यात आले. या वेळी बरेच विरोधी पक्षनेते तुरुंगात होते.
१९९३ : छोडो भारत चळवळीच्या सुवर्णजयंती सांगतासमारंभानिमित्ताने 'सरहद गांधी' खान अब्दुल गफार खान यांच्या टपाल तिकिटाचे प्रकाशन
१९९६ : पद्मभूषण व पद्मश्री पुरस्कार तसचं, भारतरत्न पुरस्कार सन्मानित जगप्रसिद्ध भारतीय क्रिकेटपटू मास्टर ब्लास्टर सचिन तेंडूलकर यांची भारतीय क्रिकेट संघाच्या कर्णधार पदी नियुक्ती करण्यात आली.
२००० : भाभा अणूसंशोधन केन्द्राचे संचालक डॉ. अनिल काकोडकर यांना दिल्ली येथील 'इन्स्टिट्युट ऑफ इंडस्ट्रियल रिसर्च' या संस्थेचा सुवर्णमहोत्सवी गौरव पुरस्कार जाहीर
२००५ : अमेरिकन अंतराळ संस्था नासाचे डिस्कव्हरी हे मानवरहित अंतराळ यान चौदा दिवसांच्या साहसी आणि धोकादायक प्रवासानंतर कॅलिफोर्नियास्थित एअरबेसवर सुरक्षितपणे उतरले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६३१ : इंग्लंड देशांतील पहिले कवी पुरस्कार विजेते इंग्रज कवी, साहित्यिक समीक्षक, अनुवादक आणि नाटककार जॉन ड्राइडन यांचा जन्मदिन.
१७५४ : पिअर चार्ल्स एल्फांट वॉशिंग्टन शहराचे रचनाकार फ्रेन्च अमेरिकन वास्तुविशारद आणि स्थापत्य अभियंता (मृत्यू: १४ जून १८२५)
१७७६ : ॲमेडीओ ॲव्होगॅड्रो इटालियन रसायनशास्त्रज्ञ (मृत्यू: ९ जुलै १८५६)
१८७६ : ब्रिटीश कालीन भारतातील बंगाल प्रांताचे गव्हर्नर लॉर्ड लिटन द्वितीय ( -, २) यांचा जन्मदिन.
१८९० : 'संगीतसूर्य' केशवराव भोसले 'संगीत सौभद्र' मधील धैर्यधराच्या भूमिकेत गाजलेले गायक अभिनेते. 'हाच मुलाचा बाप', 'सन्याशाच्या मुलगा' या नाटकांतील त्यांच्या भूमिका गाजल्या. त्यांनी स्थापन केलेल्या ललितकलादर्श संगीत नाटक मंडळींतर्फे 'सौभद्र', 'शारदा', 'राक्षसी महत्त्वाकांक्षा' इ. अनेक नाटके रंगभूमीवर आली. (मृत्यू: ४ आक्टोबर १९२१)
१८९१ : सयुक्त प्रांताचे माजी राज्यपाल फ्रान्सिस वर्नर वाईली यांचा जन्मदिन.
१८९३ : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित प्रख्यात भारतीय हिंदी कादंबरीकार, संपादक आणि गद्य लेखक शिवपूजन सहाय यांचा जन्मदिन.
१९०९ : डॉ. विनायक कृष्ण गोकाक ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कन्नड साहित्यिक, शिक्षणतज्ञ व इंग्रजी वाङ्मयाचे गाढे अभ्यासक (मृत्यू: २८ एप्रिल १९९२)
१९२० : कृ. ब. निकुम्ब 'घाल घाल पिंगा वार्या, माझ्या परसात' या कवितेमुळे परिचित असलेले भावकवी. त्यांचे अनेक कवितासंग्रह व 'सायसाखर' हे खंडकाव्य प्रसिद्ध आहे. (मृत्यू:)
१९३३ : साहित्य अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय हिंदी लेखक, पत्रकार आणि पटकथा लेखक व कादंबरीकार मनोहर श्याम जोशी यांचा जन्मदिन.
१९३७ : मॉरिशस येथील पसिद्ध भारतीय हिंदी साहित्यकार अभिमन्यू अनंत यांचा जन्मदिन.
१९७५ : भारतीय अभिनेते आणि निर्माते महेश बाबू यांचा जन्म.
१९९१ : हंसिका मोटवानी अभिनेत्री व मॉडेल

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९०१ : विष्णूदास अमृत भावे मराठी रंगभुमीचे जनक, त्यांची पन्नासहून अधिक नाट्याख्याने 'नाट्यकवितासंग्रह' या नावाने प्रसिद्ध झाली आहेत. (जन्म: ? ? १८१९)
१९४८ : हुगो बॉस कानी चे संस्थापक हुगो बॉस यांचे निधन. (जन्म: ८ जुलै १८८५)
१९६२ : नोबल पारितोषिक पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध जर्मन स्विस कवी, कादंबरीकार आणि चित्रकार हर्मन कार्ल हेसे यांचे निधन.
१९७० : ब्रिटीश कालीन भारतात तीस वर्ष तुरुंगवास भोगणारे प्रख्यात भारतीय स्वातंत्र्य कार्यकर्ते व राजकारणी त्रिलोकनाथ चक्रवर्ती यांचे निधन.
१९७६ : जान निसार अख्तर ऊर्दू शायर व गीतकार (जन्म: १४ फेब्रुवारी १९१४)
१९९६ : जेट इंजिन चे शोधक फ्रँक व्हाटलेट यांचे निधन. (जन्म: १ जुन १९०७)
२००२ : शांताबाई दाणी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायी (जन्म: १ जानेवारी १९१८)
२०१५ : भारतीय पत्रकार, लेखक, आणि कवी काययार सिंहनाथ राय यांचे निधन. (जन्म: ८ जून १९१५)

## थोडक्यात



### रोहित मुंडे,आरोही शिंदे नवोदय प्रवेश पात्र

दिंद्रुड : माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील खोलेश्वर विद्यालयाचा विद्यार्थी रोहीत रामेश्वर मुंडे व चंद्रभागा पोदार लर्न स्कूलची विद्यार्थिनी आरोही नितीन शिंदे हे गढी येथील जवाहर नवोदय विद्यालयात द्वितीय यादीत प्रवेश पात्र ठरले आहेत. त्यांच्या यशाबाबत पंचक्रोशीतुन अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

जवाहर नवोदय विद्यालय हे केंद्र शासनाच्या अधिपत्याखाली प्रत्येक जिल्ह्यात ग्रामीण भागातील बहुतांश विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे कार्य करते. या विद्यालयात शिक्षण घेतलेला विद्यार्थी जीवनात सार्वभौम नागरिक बनण्यास पात्र ठरत असल्याचे दिसत आहे. गेल्या काही वर्षात माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील शेकडो विद्यार्थी या विद्यालयात प्रवेश पात्र ठरले आहेत. सन २०२३-२४ च्या प्रवेश पात्र पुर्व परीक्षेत दिंद्रुड येथील खोलेश्वर विद्यालय, अभिनव पब्लिक स्कूल व चंद्रभागा पोदार लर्न स्कूल च्या विद्यार्थ्यांनी गडी येथील विद्यालयात प्रवेश मिळवला आहे. द्वितीय यादीत खोलेश्वर विद्यालयाचा विद्यार्थी रोहीत रामेश्वर मुंडे व चंद्रभागा पोदार लर्न स्कूलची विद्यार्थिनी आरोही नितीन शिंदे ही प्रवेश पात्र ठरले असून खोलेश्वर विद्यालयाचे अध्यक्ष दिलीपराव पारेकर साहेब, चंद्रभागा पोदार लर्न स्कूलचे अध्यक्ष अतुलजी ठोंबरे सह शिक्षकांनी पात्र विद्यार्थ्यांना अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या.

### प्रा. प्रदीप जोगदंड यांचे सेट परीक्षेत यश



माजलगाव : येथील रहिवाशी व ज्येष्ठ शिक्षक नेते यू.के. जोगदंड सर यांचे चिरंजीव व जनता कनिष्ठ महाविद्यालय पोहरेगाव तालुका रेनापुर जिल्हा लातूर या कनिष्ठ महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम करीत असलेले प्राध्यापक प्रदीप उत्तमराव जोगदंड यांनी सहाय्यक प्राध्यापक पदासाठी आवश्यक असलेली सेट (महाराष्ट्र स्टेट एलिजिबिलिटी टेस्ट) परीक्षा ही सहाय्यक प्राध्यापक पदासाठी आवश्यक असलेली परीक्षा पास होऊन यश मिळवले आहे अत्यंत उच्च विद्याविभूषित प्राध्यापक प्रदीप जोगदंड यांनी यापूर्वी एम.ए.इंग्लिश, एम.ए.मराठी, एम.ए.इतिहास, व एम.एड या नंतर आता त्यांनी सीट परीक्षेत उत्तीर्ण होऊन यश मिळवल्याबद्दल जनता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य व संस्थाचालक यांच्यासह माजलगाव आतील त्यांचे वडील शिक्षक नेते युके जोगदंड सर यांच्यासह सर्व मित्र परिवार व माजलगाव पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश मोगरेकर,ज्येष्ठ पत्रकार महेंद्र मस्के ज्येष्ठ पत्रकार तानाजी शिरसाठ पत्रकार किशन भदर्गे यांच्यासह प्रदीप जोगदंड सर यांच्या मित्र परिवाराने त्यांचे अभिनंदन केले आहे

### केशरबाई साळवे यांचे निधन



माजलगाव : ग्लोबल आडगावचे जनक नाटककार प्रा.अनिलकुमार साळवे यांच्या मातोश्री केशरबाई उत्तमराव साळवे यांचे गुरुवार दि.०८ ऑगस्ट रोजी निधन झाले.मृत्यू समयी त्यांचे वय ६५ वर्ष होते.गेल्या अनेक दिवसापासून त्या आजारी होत्या. मायाळू स्वभावाची महिला म्हणून त्या परिसरात परिचित होत्या. माजी नगरपरिषद बांधकाम सभापती राजेश साळवे यांच्या त्या काकी होत्या.दुपारी १२:३० वाजता त्यांचा अंतिम संस्कार मंगलनाथ येथील समशान भुमीत बौद्ध पद्धतीने करण्यात आला आहे.त्यांच्या पश्चात दोन मुले,दोन मुली, सुना,जावई,नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# केज तालुक्यातील विहीरी व गायगोठा रक्कम जमा करा

## अन्यथा के.पं.स.समोर आत्मदहन करणार -रोहन गलांडे पाटील

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील प्रेत्येक ग्रामपंचायत अंतर्गत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना म्हणजेच मनरेगाच्या माध्यमातून खोदलेल्या शेतकऱ्यांचे वयक्तीक लाभार्थ्यांचे सिंचन विहीर खोदण्यासाठीचे ४ लाख रुपये अनुदान व गायगोटा योजनेचे ७८ हजार अशा दोन्ही योजनेचे शासनाकडून निधी मागवून लवकरात लवकर लाभार्थी यांना रक्कम मिळावी व तात्काळ शासनाने द्यावी जर तात्काळ रक्कम देण्यात आली नाही तर केज पंचायत समिती समोर आत्मदहन करणार आहे असा इशारा शासनाला निवेदनाद्वारे अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ महाराष्ट्र राज्य केज तालुकाध्यक्ष रोहन गलांडे पाटील यांनी दीला आहे या विषयी निवेदनाद्वारे सविस्तर वृत्त असे की महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना म्हणजेच मनरेगाच्या माध्यमातून केज तालुक्यातील लाभार्थी शेतकऱ्यांचे वयक्तीक लाभार्थ्यांचे शासन कागदोपत्री प्रक्रिया ज्या लाभार्थांची पुर्ण झाली आहे व केज तालुक्यातील ग्रामपंचायत अंतर्गत ज्या लाभार्थ्यांनी



मनरेगा जलसिंचन विहीर योजनेचे लाभार्थी आहेत लाभार्थांन कडील शासन प्रक्रिया पूर्ण झालेली आहे परंतु अद्याप पर्यंत लाभार्थ्यांना मनरेगा योजने अंतर्गत झालेल्या विहीरीचा ऐकही रुपये रक्कम देण्यात आलेली नाही चार - पाच महिने झाले केज तालुक्यातील विहीर लाभार्थी शेतकरी मनरेगा विहीर योजने अंतर्गत ४ लाख अनुदान मिळणार म्हणून व्याजाचे पैसे काढून विहीरीला खर्च करून विहीर खोदल्या आहेत परंतु शासना कडुन महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत खोदलेल्या विहीरीची ४ लाख रुपये रक्कमेतील ऐक रुपये शेतकऱ्यांच्या , लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात आलेला नाही तरी शासनाने केज तालुक्यातील प्रेत्येक ग्रामपंचायत अंतर्गत झालेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत खोदलेल्या विहीरीचे ४ लाख अनुदान व गायगोठा योजनेचे ७८ हजार शासनाकडून निधी मागवून लवकरात लवकर लाभार्थी यांना रक्कम मिळावी,अनुदान शासन कागदोपत्री प्रीक्रीया तात्काळ पुर्ण करुन लाभार्थ्यांच्या बँक खात्यात तात्काळ जमा करावे अन्यथा अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ केज तालुकाध्यक्ष रोहन गलांडे पाटील केज पंचायत समिती समोर आत्मदहन करण्याचा शासनाला इशारा रोहन गलांडे यांनी निवेदनाद्वारे दीला आहे.

जलसिंचन विहीर लाभार्थी यांची बीले पास होऊन दोन महीने झाले आहेत तरी शासनाकडून निधी आलेला नाही.ग्राम रोजगार सेवक संघटना केज तालुका सचिव अनिल घोडके.

## पिकविमा,कर्जमाफीसाठी धरणे आंदोलनात सहभागी व्हा-पांचाळ

माजलगाव । प्रतिनिधी

गेल्या दहा वर्षात शेतकरी पूर्णत: नागवला असताना शासन शेतकऱ्याची कर्जमाफी करू शकलेले नाही तसेच २०२० व २३-२४ सालचा पिक विमा अद्याप शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेला नाही, सर्वात महत्त्वाचा आणि जिव्हाळ्याचा म्हणजे शेतकऱ्याच्या शेतमालाला किपायातशिर हमीभावाचा प्रश्न अनेक दशकापासून प्रलंबित असून त्याकडे राज्यकर्त्याचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असून शेतकऱ्याला उध्वस्त करणाऱ्या सरकारला जॉब विचारण्यासाठी ०९ ऑगस्ट रोजी उपविभागीय कार्यालयासमोर होत असलेल्या धरणे आंदोलनात सहभागी व्हा असे आवाहन शेतकरी कामगार पक्षाचे भाई मुंजा पांचाळ यांनी केले आहे.



शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने माजलगाव मतदार संघात शेतकरी संवाद दौरा सुरू असुन या मध्ये शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी झालीच पाहिजे, पिक विमा शेतकऱ्यांना तात्काळ मिळालाच पाहिजे, उसाचे गेल्या दोन वर्षाचे राहिलेले पैसे तात्काळ शेतकऱ्यांचा खात्यात जमा झाले पाहीजे.. पि एम किसान यौजने पासुन वंचित शेतकर्यांचा सदर यौजनेत तत्काळ समावेश केला पाहीजे..शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारीत हमी भाव दिला पाहिजे.बि-बियाणांच्या व खतांच्या वाढत्या किमती तात्काळ कमी झाले पाहिजे..माजलगाव तालुक्यातील सर्वच पांदन रस्त्याचे मुरुम-खडीकरण झाले पाहिजे.. लोकनेते कारखान्याने शेवटच्या ११ दिवसाच्या काळातील गाळप केलेल्या ऊसाचे बिल तात्काळ अदा झाले पाहिजे सह अनेक प्रश्नांसाठी शेतकरी कामगार पक्षाच्या राज्य मध्यवर्ती समितीचे सदस्य भाई अॅड.नारायण गोले पाटिल, यांच्या नेतृत्वाखाली दि.०९ऑगस्ट रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर होत असलेल्या धरणे आंदोलनात सहभागी होऊन पिकविमा,कर्जमाफी, हमीभावासह लोकनेते साखर कारखाना,रोषणपुरी येथिल गुळ कारखान्याच्या थकीत पैशासाठी सरकारला जाब विचारावा असे आवाहन शेतकरी कामगार पक्षाचे भाई मुंजा पांचाळ,भाई राहुल सोळंके,भाई लक्ष्मण आप्पा चव्हाण,भाई अशोक कुलकर्णी,भाई सतिष शेजुळ,भाई माऊली चंदनशिव,भाई सुदाम चव्हाण, भाई विष्णु शेळके,भाई चांगदेव शेजुळ,भाई साळुजी हांडे,भाई अनंत चव्हाण,राजेश्वर मोरे, यांच्यासह आदिंनी केले आहे..

## जगदीश सुरभैय्ये आत्महत्त्या प्रकरणी गुन्हा दाखल करुन आ.कुचे यांना अटक करा : मा आ. सांबरे

जालना । प्रतिनिधी

बदनापूर अंबड विधानसभेचे भाजप आमदार नारायण कुचे यांनी एकास आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची मागणी माजी आमदार संतोष सांबरे यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पोलीस महासंचालक यांच्याकडे मागणी केली आहे. संबंधित पोलीस स्टेशनला तक्रार दाखल भाजप आमदार कुचेंकडुन गुन्हा दाखल न करण्यासाठी सत्तेचा गैरवापर करत पोलीस प्रशासनावर दबाव आणीत असल्याचे आरोप माजी आमदार संतोष सांबरे यांनी केला आहे.

छत्रपती संभाजीनगर येथील उस्मानपुरा पोलिस ठाणे हद्दीतील मिलींदनगर येथे जगदीश खेमचंद सुरभैय्ये या तरुणाने आत्महत्या केलेली आहे. मयत जगदीश यांनी सन २०१९ मध्ये जय भवानी बँकेकडुन रुपये दोन लक्ष इतके कर्ज घेतलेले असुन त्याचे आजपर्यंतचे संपुर्ण व्याज त्यांनी भरलेले आहे. जालना जिल्ह्यातील बदनापूर भाजपाचे आमदार नारायण कुचे व त्यांचे भाऊ देविदास कुचे हे कर्ज वसुलीसाठी मयत जगदीश यास सततच्या धमक्या देत त्रास होते. आ. नारायण कुचे व देविदास कुचे यांच्या धमक्यांना व त्रासाला कंटाळुन मयत जगदीश यांनी दिनांक ०६/०८/२०२४ रोजी आत्महत्या करत असल्याचे सुसाईड नोटमध्ये स्पष्टपणे लिहीलेले आहे. व ही सुसाईड नोट समाजमाध्यमावर व्हायरल झाली आहे. भारतीय जनता पक्षाला सत्तेचा



माज चढला असुन खुलेआम सर्वसामान्य लोकांना आत्महत्तेस प्रवृत्त केले जात असुन प्रशासन याबाबत चालढकल करत आहे. ही घटना होऊन अद्यापर्यंत उस्मानपुरा पोलीस ठाण्यात आत्महत्तेस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झालेला नाही. यावरुन गृहविभाग अर्थात पोलीस प्रशासन हे सत्ताधारी भाजप आमदार व त्यांच्या भावाला पाठीशी घालत असल्याचे दिसुन येत आहे. एकीकडे राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस हे वेळोवेळी कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी याकरिता प्रयत्न करत असल्याचे बोलत असतात मात्र दुसरीकडे त्यांच्याच पक्षाचे सत्ताधारी आमदार लोंकांना आत्महत्तेस भाग पाडत कायदा व सुव्यवस्थेचे धिंडवडे काढतांना दिसत आहे. व प्रशासन देखील अशांकडे जाणिवपुर्वक दुर्लक्ष करत गुन्हेगारांना पाठीशी घालत असल्याचे दिसत आहे. भाजपाचे बदनापूरचे आमदार नारायण कुचे यांना सत्तेची प्रचंड मस्ती आलेली असुन सत्तेचा गैरवापर करत लोकांना धमकावणे, त्रास देणे नेहमीचेच झाले आहे. त्यांची मस्ती ही लोकांना धमकावण्यापासुन लोकांना आत्महत्या करण्यास भाग पाडत आहे. मयत जगदीश सुरभैय्ये यांना आत्महत्तेस प्रवृत्त केल्याप्रकरणी सुसाईड नोट हा सबळ पुरावा उपलब्ध असल्याने आमदार नारायण कुचे व देविदास कुचे यांच्यावर गुन्हा दाखल करुन दोघांना तात्काळ अटक करावी व सामान्य पिडीताला न्याय द्यावा जेणेकरुन सर्वसामान्य जनतेचा कायद्यावर असणारा विश्वास कायम राहिल. सदरील घटनेवरुन सत्ताधारी भाजपाचे बदनापूर चे आमदार नारायण कुचे व त्यांचे भाऊ देविदास कुचे यांना त्यांच्याच पक्षाचे गृहमंत्री गुन्हा दाखल करुन अटक करतील का ? की पाठीशी घालतील ? असा प्रश्न सर्वसामान्य जनता आणि शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे माजी आमदार संतोष सांबरे यांनी उपस्थित केला आहे.

# महसूल विभागाने दप्तर दिरंगाई थांबवून योजनांचा लाभ द्यावा

## संजय गांधी, श्रावणबाळ, आत्महत्याग्रस्त, दिव्यांग योजनेसाठी लाभार्थी प्रतीक्षेत

बीड । प्रतिनिधी

महसूल विभागाच्या मार्फत राबवल्या जाणाऱ्या विविध योजनांच्या संदर्भात विभागाकडून दप्तर दिरंगाई केली जात असून अनेक पात्र नागरीक लाभाच्या प्रतीक्षेत आहेत.अर्जप्रक्रिया आणि प्रस्ताव निकषपात्र असताना अनेक लाभार्थ्यांना विभागाच्या अनास्थेमुळे त्रास सहन करावा लागत असून यावर आ. संदिप क्षीरसागर यांनी तातडीने सर्व प्रकरणे निकाली काढून लाभार्थ्यांना, लाभ वितरित करा अशा सूचना दिल्या आहेत.

बीड मतदारसंघ क्षेत्रातील बीड आणि शिरूर का. तहसील अंतर्गत अनेक निकषपात्र



नागरिकांनी संजय गांधी निराधार अनुदान योजना , श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबासाठी असलेल्या विविध योजना, दिव्यांग बांधवांसाठीच्या योजना इत्यादी योजनांसाठी अर्ज व प्रस्ताव दाखल केलेले आहेत. परंतु महसूल विभाग आणि तहसील प्रशासनाच्या दिरंगाई आणि अनास्थेमुळे गेल्या अनेक दिवसांपासून हे प्रस्ताव प्रलंबित आहेत. यामुळे पात्र असलेल्या लाभार्त्यांना लाभापासून वंचित राहावा लागत आहे व विनाकारण त्रास सहन करावा लागत आहे. हि बाब लक्षात घेता आ. संदीप क्षीरसागर यांनी यासंदर्भात तात्काळ कार्यवाही करून संबंधित नागरिकांना लाभाचे वितरण करावे अशा सूचना बीड व शिरूर (का.) तहसीलदारांना दिल्या आहेत. तसेच याबाबत आ.क्षीरसागर यांनी विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी यांच्याकडेही पत्रव्यवहार केला आहे.

जा.क्र.न.प/अंबड/नामांतर/२०२४/५६५
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक- ०१/०८/२०२२४

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री./सौ. श्रीमती :- कलाबाई पंढरीनाथ शिंदे ता. अंबड जि. जालना' न. प. भि.नं. ११-३३ चे हस्तांतरण करणे बाबत प्रकरण

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प. मालमत्ता घर क्र. (११-३३ ) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा :
पुर्व :- सरकारी रस्ता, पश्चिम :- सरकारी बोळ
दक्षिण :- सरकारी रस्ता, उत्तर :- न. प. ची सहान जागा

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२४/५६६
कर्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक : ०२/०८/२०२४

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री. सौ. श्रीमती :- रेणुका प्रकाश मुंजाळ रा. अंबड ता. अंबड जि. जालना सर्वे नं. ४५४/१ प्लॉट नं. ३२ सि.स.नं. १८७४/९/३२ प्रकरण न.प.भि.नं. १८-१०६-३२ चे हस्तांतरणकरणे बाबत

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प. मालमत्ता घर क्र. (१८-१०६-३२) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा :
पुर्व : पारनेर रोड, पश्चिम : प्लॉट नं. २९,
दक्षिण प्लॉट नं. ३१, उत्तर: प्लॉट नं. ३३

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

**जाहीरनामा**

**मा.श्री. संजय टी. सहारे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक:- ११२९/२०२४**

**( मार्फत विधिज्ञ:- श्री जी एस घुगे)**

अर्जदार :- १. तारामती रामभाउ घुगे, वय ५८, २. मुक्ताबाई गोरख भांगे, वय ४१ वर्षे, धंदा घरकाम, घरकाम, ३. सदाशिव रामभाउ भांगे, वय ३५ वर्षे, धंदा शेती, ४. शिवहरी रामभाउ घुगे, वय ३३ वर्षे, धंदा शेती, सर्व रा. मु.पो. बोरफडी, ता. जि. बीड,

विरुध्द निरंक

प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी नामे रामभाउ दगडु घुगे हे/या दि. २५/१२/२००७ रोजी राहते घरी बोरफडी येथे मयत असुन अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी आहे. अर्जदार क्र.२ ही मयताची मुलगी आहे. तर अर्जदार क्र. ३ व ४ हे मयताचे मुले आहेत. अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे. अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्यलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. आज दिनांक:- ०७/०८/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली. पुढील तारीख:- १९/०९/२०२४.

**याची प्रती बजावणीस्तव**
बेलिफ विभाग, दि.न्या.व. स्तर, बीड, १) ग्रामपंचायत / नगरपरीषद कार्यालय, बोरफडी, ता.जि.बीड, यांचे नोटीस बोर्डवर डकविणे कामी. २) तहसिल कार्यालय, बीड, यांचे नोटीस बोर्डवर डकविणे कामी. ३) दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड यांचे नोटीस बोर्डवर डकविणे कामी.

शिक्का

**आदेशावरून**
**स्वाक्षरित**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व. स्तर बीड**

## बाजार समितीची जमीन विक्री प्रक्रिया कायदेशीर; शासनाच्या परवानगीनेच होतोय व्यवहार

### सभापती जयदत्त नरवडे यांची माहिती

माजलगाव । प्रतिनिधी

शहरालगत असलेल्या बाजार समितीची साडेचार एकर जमीन पणन संचालकांच्या परवानगीने व अटी व शर्तीच्या अधीन राहून विक्री केली असून सर्व प्रक्रिया इ- टेंडर केली असून जमीन विक्री प्रक्रिया संपूर्ण पणे कायदेशीर रित्या केली असल्याची माहिती बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

प्रसिद्धस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मालकीची मंजरथ रोड लगतची माजलगाव नगर परिषद हद्दीतील साडेचार एकर जमीन आहे ज्याचे शासकीय मूल्यांकन तीन कोटी ३४ लाख ८७ हजार ७३४ असून या किंमती पेक्षा जास्तीची रक्कम बाजार समितीने तीन कोटी ३७ लाख रुपये एवढी ठरवली असून या पेक्षा जो कोणी ई-निविदा भरेल त्यास जमीन करण्याचे बाजार समितीचे नियम,अटी व शर्तीच्या आधीन राहून विक्री केली आहे



सदरील विक्रीतून येणारी रक्कम ही कृषी उत्पन्न बाजार समितीने कृषी पणन मंडळाकडून घेतलेले कर्ज भरणा करण्यात येणार आहे.या बाजार समितीने टी.एम.सी.प्रकल्प व मुख्य बाजार आवार फुले पिंपळगाव येथील रस्ते,लाईट,पाणी व्यवस्था इत्यादी विकास कामासाठी सन २००७व २००९ मध्ये दोन कोटी कर्ज घेतले होते यापैकी बाजार समितीने ७० लाख रुपये मुद्दल व ४५ लाख रुपये व्याज भरणा केलेले आहे सद्यस्थितीत मुद्दल १कोटी ३० लाख व त्यावर वरील व्याज २कोटी झालेले असून असे एकूण ३ कोटी ३० लाख रुपये बाजार समितीकडे देणे असून कृषी पणन मंडळाने ओ. टी. एस.योजनेद्वारे ५०% व्याज सवलत मिळणार आहे सदरील योजनेचा लाभ घेण्यासाठी बाजार समितीकडे एवढी मोठी रक्कम शिल्लक नसल्याने सदरील जमीन विक्री करण्याचा निर्णय घेतला आहे ही जमीन गुरांचा बाजार भरवण्यासाठी तात्कालीन सभापती कै. दादासाहेब रांजवण यांनी खरेदी केली होती परंतु सदरील जमीन ही आऊट साईटला असल्याने त्याठिकाणी गुरांचा बाजार भरला नाही तसेच याठिकाणी बाजार समितीने फळे भाजीपाला इ.मार्केट सुरू करण्याचा प्रयत्न केला होता परंतु त्यास प्रतिसाद न मिळाल्याने सदरील जागा अविकसित राहिल्याने त्या जमिनी पासून कोणतेही उत्पन्न मिळालेले नाही विक्रीतून येणाऱ्या रकमेतून एक रकमी कर्ज भरून बाजार समिती कर्जमुक्त होणार आहे व यानंतर बाजार समिती आवारात अद्यावत गोदाम व धान्य वाळवण्यासाठी मोठे ओटे,व सेल हॉल (शेड) उभारण्यात येणार आहे. अशी माहिती या प्रसिद्धी पत्रकात सभापती जयदत्त नरवडे,उपसभापती श्रीहरी मोरे,सचिव हरिभाऊ सवने यांनी दिली आहे.

## पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्रा यांची धारूर पोलीस ठाण्याला भेट




धारूर /प्रतिनिधी

विशेष पोलीस महानिरीक्षक संभाजीनगर चे वीरेंद्र मिश्रा (भा.पो.से) यांनी ७ ऑगस्ट रोजी धारूर पोलीस स्टेशनला अचानक भेट देऊन पाहणी केली. यावेळी सहायक पोलीस अधीक्षक कमलेश मीना, प्रभारी पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे, धारूर पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी उपस्थित होते.धारूर येथील पोलीस स्टेशन अंतर्गत अडचणी, कर्मचाऱ्यांचे निवासस्थान पोलीस स्टेशन बांधकाम आधी सुविधा मिळाव्यात यासाठी मागणी केली. धारूर पोलीस स्टेशनची असलेली इमारतीला आज घडीला ५६ वर्षे पूर्ण झाले आहेत त्यासाठी नवीन इमारत व पोलीस कर्मचाऱ्यांसाठी घर मिळावे यासाठी यावेळी मागणी करण्यात आली. या मागणीची दखल घेऊ यावेळी पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र यांनी उपस्थित असलेले अधिकारी पोलीस कर्मचारी यांना आश्वासन दिले.

# मांजरा धरणात फक्त २.३२ टक्केच जिवंत पाणीसाठा

## २२४.०९३ दलघमी साठवण क्षमतेच्या धरणात फक्त ५१.२२७ दलघमी पाणी साठा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

बीड-लातुर-उस्मानाबाद जिल्ह्यातील अनेक गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या २२४.०९३ दलघमी पाणी साठवण क्षमता असलेल्या मांजरा धरणात आज ७ ऑगस्ट रोजी सकाळपर्यंत फक्त ५१.२२७ दलघमी एवढाच एकूण पाणीसाठा उपलब्ध असल्यामुळे या धरणावर पाणीपुरवठा अवलंबून असलेल्या गावांमधील नागरिकांच्या काळजाचा ठोका वाढला आहे.

बीड-लातूर आणि उस्मानाबाद या तीन जिल्ह्यातील भुभागाच्या सीमेला चिटकून असलेल्या अनेक गावाच्या पिण्याच्या पाण्याचा आणि सिंचनाचा प्रश्न सोडवण्यासाठी १९७१ साली मंजुर करण्यात आलेले मांजर धरण या वर्षीच्या पावसाळ्यात आज पर्यंत झालेल्या पावसामुळे अजूनपर्यंत तरी आपला तळ कसा-बसा झाकून आहे. आज अखेर या धरणात फक्त अडीच टक्केच पाणीसाठा उपलब्ध असल्यामुळे या धरणावर पाणी पुरवठा अवलंबून असलेल्या



गावांच्या काळजाचे ठोके आता वाढू लागले आहेत. २२४.०९३ दलघमी पाणी साठवण क्षमता असलेल्या या धरणात आता फक्त ५१.२२७ दलघमी एवढाच पाणी साठा उपलब्ध आहे. या धरणात आज मितीस फक्त ५१.२२७ दलघमी एवढाच पाणी साठा उपलब्ध आसून त्याची टक्केवारी २.३२ दलघमी एवढीच येते. यावर्षी पावसाळ्याच्या सुरुवातीपासून धरण क्षेत्रात फक्त ५२८.०० मिमी एवढाच पावूस झाला असल्यामुळे धरणक्षेत्रातील पाणी साठ्यात वाढ होवू शकली नाही. मांजरा धरणात उपलब्ध असलेल्या पाण्याचे योग्य नियोजन करण्यासाठी लातूर येथे कार्यकारी आभियंत्यांचे स्वतंत्र कार्यालय आहे. ऐकेकाळी बीड-लातुर-उस्मानाबाद या तीन जिल्ह्यातील सिंचन आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी बांधलेल्या या धरणातील पाण्याचे योग्य नियोजन व्हायला हवे, मात्र राजकीय हस्तक्षेपामुळे संबंधित अधिका-यांना इच्छा असूनही अशा प्रकारचे नियोजन करता येत नसल्याचे अधिकारी खाजगीत बोलत आहेत. परीणामी मागच्या वर्षी ओथंबून वाहणाऱ्या धरणातील पाणीसाठा आज एकदम २.३२ टक्क्यावर येवून ठेपला आहे. ही बाब या धरणावर पाणीपुरवठा अवलंबून असणाऱ्या गावांच्या काळजाचा ठोका वाढवणारी निश्चितच आहे.

# शेतकऱ्यांचे अनुदान तत्काळ जमा करा -राजेंद्र आमटे

**बीड । प्रतिनिधी**



निवडणुका आल्या की शेतकऱ्यांच्या नावावर मताचा जोगवा मागणाऱ्या सरकारने शेतकरी वाऱ्यावर सोडले आहे. मागील दोन वर्षांपासून शेतकऱ्यांचे तुषार व ठिबक सिंचन अनुदान जमा केलेले नाही यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. शेतकऱ्याने ठिबक सिंचन व तुषार सिंचन बसवण्यासाठी बँका व खाजगी सावकार, पतसंस्था असे व्याजाने कर्ज काढून ठिबक सिंचन व तुषार सिंचन बसवले आहेत परंतु मागील दोन वर्षांपासून शेतकऱ्यांचे तुषार सिंचन व ठिबक सिंचन अनुदान वाटप करण्यात आलेले नाही ते अनुदान तत्काळ जमा करावे व नवीन प्रकरणांना मंजुरी तत्काळ देण्यात यावी, सन २०२३ खरीप हंगामातील भारतीय कृषी विमा कंपनी कडे स्थकीत असलेला पीक विमा तत्काळ जमा करावा, सोयाबीन व कापूस पिकाचे २०२३-२४ वर्षातील शासनाने घोषित केलेले अनुदान तत्काळ जमा करावे या मागणीसाठी बीड जिल्हा मधील शेतकऱ्याच्या वतीने शेतकरी आक्रोश मोर्चा काढण्यात आला आहे हा मोर्चा छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय येथे होणार आहे या शेतकरी आक्रोश मोर्चा साठी शिवसंग्राम शेतकरी आघाडीचा जाहीर पाठिंबा देण्यात येत आहे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन शिवसंग्राम शेतकरी जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे यांच्या वतीने करण्यात येत आहे

## अनिल देवा बिवरे यांना पितृशोक

**आष्टी । प्रतिनिधी**

चिखली नाथ येथील सुधाकर गोविंदराव बिवरे यांचे वयाच्या ८९ व्या वर्षी वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले.

आष्टी तालुक्यातील वेदशास्त्र संपन्न अनिल देवा बिवरे यांचे वडील सुधाकर गोविंदराव देवरे यांचे वृद्धापकाळाने बुधवारी सायंकाळी सहाच्या सुमारास निधन झाले.अत्यंत शांत संयमी आणि मनमिळावू असे त्यांचे व्यक्तिमत्व होते. त्यांच्यावर बुधवारी आष्टी येथील स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुले दोन मुली सुना जावई नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# ढोर कुटुंबावर प्राणघातक हल्ला चकलांबा येथील घटनेने दहशत

**गेवराई । प्रतिनिधी**

एखाद्या गावात एखाद्य कुटुंब असले कि त्याचे हक्क अधिकार कुणीही दाबू शकते का अशी शंका येणारे प्रकरण चकलांबा येथे घडले असून अवसारे कुटुंबावर राक्षे कुटुंबाने प्राणघातक हल्ला केला आहे . यात अवसारे कुटुंब रक्तबंबाळ झाले व उपचारासाठी दवाखान्यात दाखल झाले .गुन्हा दाखल होणार या भीतीने खोटी केस करण्यासाठी समोरील पक्ष देखील दवाखान्यात दाखल झाल्याचा आरोप यावेळी करण्यात आला .

बांध कोरण्याचा वाद विकोपाला गेला आणि त्रीम्ब्यक कचरू अवसारे त्यांची पत्नी पद्मावती , मुलगी तनुजा व मुलगा वीर यावर प्रचंड हल्ला करण्यात आला .



सदरील हल्ला विशाल राक्षे रामनाथ राक्षे अजिनाथ राक्षे बाळू राक्षे व मीराबाई राक्षे संगीता राक्षे निकीता राक्षे यांनी केल्याचा आरोप पिडीतानी केला आहे . सदरील प्रकार किळसवाना व संतापजनक असल्याचे समाजातून बोलले जाते आहे.

### अन्याय खपवून घेणार नाही -अतुल भालशंकर

ढोर समाज अत्यल्प संख्येने जिल्ह्यात जगतो आहे मात्र आम्ही संख्येने कमी म्हणून कुणी अन्याय अत्याचार करणार असेल डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा कायदा सर्वांना सारखा आहे .कुठल्या गावात भागात ढोर समाजातील व्यक्ती कुटुंबावर अन्याय केला तर आम्ही सहन करणार नसल्याचे ढोर समाजाचे जिल्हाध्यक्ष अतुल भालशंकर यांनी म्हटले .त्यांनी सदरील प्रकार जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांना कळवला.

# भाई थावरेंनी घेतली शरद पवारांची भेट माजलगाव मतदारसंघातून मागितली उमेदवारी

**माजलगाव । प्रतिनिधी**

शेतकरी नेते भाई गंगाभिषण थावरे यांनी दि ०८ ऑगस्ट गुरुवार रोजी दिल्ली येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेऊन माजलगाव मतदारसंघातून उमेदवारी मागितली.यावेळी पवार यांनी थावरे यांच्या खांद्यावर हात ठेवत सकारात्मक प्रतिसाद दिला.

शेतकरी संघर्ष समितीच्या माध्यमातून भाई गंगाभिषण थावरे गेल्या चाळीस वर्षांपासून माजलगाव मतदारसंघातील शेतकरी, निराधारांच्या प्रश्नासाठी झागडत आहेत. विविध आंदोलने, मोर्चा काढून थावरे यांनी पीक विमा,पीएम किसान योजना आदी शेतकऱ्यांच्या योजनांचा लाभ शेतकऱ्यांना मिळवून दिला आहे. चाळीस वर्षांपासून प्रामाणिकपणे जनसेवेच्या माध्यमातून भाई थावरे लढत आहेत. जिल्हा परिषद सदस्य असताना थावरे यांनी लोकपयोगी कामे केली आहेत.त्यांनी माजलगाव मतदारसंघात आमदार प्रकाश सोळंके यांच्या विरोधात निवडणूकही लढविली आहे. दरम्यान भाई थावरे गेल्या काही वर्षांपासून शरद पवार



यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सक्रीय काम करत आहेत. आजही शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आक्रमक भूमिका घेत लढत आहेत. यामुळे त्यांना माजलगाव मतदारसंघामध्ये मानणारा मोठा वर्ग असून आगामी विधानसभा निवडणुकीत माजलगाव मतदारसंघाातून निवडणूक लढविण्यास ते इच्छुक आहेत. दरम्यान गुरुवारी भाई थावरे यांनी दिल्ली येथे शरद पवार यांची भेट घेऊन आपल्या कार्याचा अहवाल त्यांनी पवारांकडे सादर केला आणी माजलगाव मतदारसंघातून उमेदवारी देण्याची मागणी केली.

# आगामी विधानसभा निवडणूकीत उमेदवारी देताना बौद्ध समाजातील व्यक्तीलाच प्राथमिकता द्यावी-ॲड.जगतकर

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

आतापर्यंत केज मतदारसंघात अनेक निवडणूका झाल्या मात्र राखीव मतदारसंघ असून देखील एका विशिष्ट जातीतील व्यक्तिला सातत्याने संधी मिळत गेली आहे.केज मतदारसंघात अनुसूचित जाती जमातीची संख्या भरपूर आहे.मात्र यावेळेस बौद्ध समाजातील व्यक्तिला राजकीय पक्षांनी उमेदवारी दिली पाहिजे अशी मागणी सामाजिक नेते अनंत जगतकर यांनी आज अंबाजोगाई शहरातील विश्रामगृह येथे झालेल्या पत्रकार परिषदेत केली आहे.

या वेळी अंनत जगतकर यांनी बोलतांना खंत व्यक्त केली की,आतापर्यंत केज मतदारसंघात चर्मकार समाजातील लोकच निवडून आले आहेत.१९७८ पासून आमदार सातपुते किंवा स्वामी असतील हे सर्व चर्मकार समाजातील घटकांतील व्यक्ती निवडून आले आहेत. पृथ्वीराज साठे हे अडीच वर्षांसाठी आमदार होते हे वगळता आतापर्यंत बौद्ध समाजातील एक व्यक्तीसुध्दा आमदार झाली नाही.केज मतदारसंघात बौद्ध समाजातील मतदारांची संख्याबळ लाक्षणिक



आहे.तरीही काँग्रेस पक्ष असो की अन्य पक्षांतील नेत्यांनी बौद्ध समाजाला उमेदवारी दिली नाही.तत्कालीन भाजपाचे नेते स्व.गोपीनाथ मुंडे यांनी केज मतदारसंघातून चंद्रशेखर वडमारे यांची उमेदवारी वगळता आजपर्यंत भाजप असो वा काँग्रेस पक्षाने बौद्ध समाजातील व्यक्तिला उमेदवारी का दिली नाही? असा सवाल त्यांनी केला.हा मतदारसंघ राखीव मधून राखीव आहे का ? आगामी विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेस सहित सर्वच राजकीय पक्षांनी बौद्ध समाजातील व्यक्तीलाच उमेदवारी द्यावी अशी मागणी केली.

काँग्रेस पक्षाने उमेदवारी दिली तर मी केज मतदारसंघात निवडणूक लढवणार

मला काँग्रेस पक्षाने उमेदवारी दिल्यास केज मतदारसंघात निवडणूक लढवणार असल्याची वक्तव्य काँग्रेस पक्षाचे नेते अनंत जगतकर यांनी व्यक्त केले.ते बोलताना म्हणाले की,लोकप्रतिनिधींकडून जनतेच्या खूप अपेक्षा असतात.केज मतदारसंघाचा म्हणावा तसा विकास झालेला नाही.ग्रामीण भागातील लोकांना विकासाभिमूक चेहरा हवाय.जो जनतेला न्याय मिळवून देईल. जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी मी आगामी विधानसभा निवडणूक लढवणार आहे.असे शेवटी म्हणाले. सदर पत्रकार परिषदेत काँग्रेस चे निष्ठावान नेते वसंत मोरे व शेख बाबा यांची सुध्दा प्रमुख उपस्थिती होती.

# तलाठ्यांच्या मनमानी कारभाराला प्रशासनाला अपयश

## स्वातंत्र्य दिनी मनसे वरीष्ठ अधिकाऱ्यांना काळे झेंडे दाखविणार-सुनिल जगताप

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

तालुक्यातील तलाठ्यांच्या मनमानी कारभाराला चाप (निर्बंध) बसविणे कामी महसूल प्रशासनाला आलेल्या अपयशाविरूद्ध गुरूवार, दिनांक १५ ऑगस्ट २०२४ भारतीय स्वातंत्र्यदिनी झेंडावंदन समयी महसूल प्रशासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना काळे झेंडे दाखविणार असल्याचा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उपजिल्हाध्यक्ष सुनिल जगताप यांनी तहसीलदार यांना बुधवारी दिलेल्या निवेदनातून दिला आहे.

याबाबत अधिक माहिती देताना उपजिल्हाध्यक्ष सुनिल जगताप यांनी सांगितले की, तहसीलदार अंबाजोगाई यांना यापूर्वी आम्ही महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने अंबाजोगाई तालुक्यातील सर्व तलाठ्यांना नेमणूक दिलेल्या व बांधून दिलेल्या सर्व सज्जांमध्ये कार्यालयामध्ये उपस्थित राहून कामकाज करणे बंधनकारक करणे, तसेच दिनांक ६/०१/२०१७ च्या शासन निर्णयानुसार उपस्थिती बाबतची नियमावली पाळणे बाबत विषयी निवेदने देऊन लक्षवेधी आंदोलन करून आपणाकडे तालुक्यातील तलाठ्यांच्या मनमानी विरोधात विनंती करण्यात आली होती. आपणांद्वारा उक्त आदेशाद्वारे संबंधित सर्व तलाठ्यांना सूचना ही देण्यात आलेल्या होत्या. तरी परंतु, सदरील सूचनांचे व आदेशाचे पालन आपल्या अधिनस्त



असणाऱ्या तलाठ्यांनी केले नाही, हे अत्यंत खेदाने नमूद करावे लागत आहे. एक प्रकारे तलाठ्यांच्या मनमानी कारभाराला चाप बसविण्यात आपणांस अपयश आले आहे असे आम्हांस वाटते. अद्याप रोजी ही अंबाजोगाई शहरात अनेक ठिकाणी तलाठ्यांची खाजगी कार्यालये राजरोसपणे सुरू आहेत. सदरील कार्यालयांचे आपणा वतीने पंचनामे करण्यात यावेत, या आमच्या मागणीकडे आपण दुर्लक्ष केले आहे. आपल्या सूचनांचे पालन न करता तलाठ्यांनी आपल्या आदेशाला केराची टोपली दाखवली आहे. अशा तलाठ्यांच्या विरोधात आपण कारवाईचा बडगा उगारणे अपेक्षित असताना तसे झाले नाही. गेल्या अनेक दिवसांच्या मनसेच्या मागणीला यामुळे खीळ बसली आहे, तलाठ्यांच्या मनमानी कारभाराला चाप बसावेण्यासाठी व उक्त सर्व निवेदनातील मागण्यांच्या पूर्ततेच्या अनुषंगाने आपणांस आलेल्या अपयशाविरूद्ध गुरूवार, दिनांक १५ ऑगस्ट २०२४ रोजी मनसेच्या वतीने भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या शासकीय झेंडावंदन प्रसंगी उपस्थित राहणाऱ्या महसूल प्रशासनाच्या अपर जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, तहसीलदार या व इतर अधिकाऱ्यांना काळे झेंडे दाखविण्यात येऊन व निषेध नोंदविण्यात येणार आहे. याची कृपया नोंद घ्यावी. असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. निवेदनाच्या प्रती आमदार नमिताताई मुंदडा, जिल्हाधिकारी, बीड., अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई., उपजिल्हाधिकारी, पोलीस निरीक्षक (अंबाजोगाई शहर) यांना माहितीस्तव देण्यात आल्या आहेत. सदरील निवेदनावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उपजिल्हाध्यक्ष सुनिल जगताप, गणेश बरदाळे, नितीन परदेशी, रमेश आडे, आमोद कुलकर्णी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी जल्लोषात साजरा

**बीड। प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याचे तरुण उगवते नेतृत्व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे बीड जिल्हाप्रमुख मा.परमेश्वर जी सातपुते यांचा वाढदिवस अत्यंत उत्साहात व जल्लोषात साजरा करण्यात आला. हिंदुहृदय सम्राट शिवसेनाप्रमुख मा बाळासाहेब ठाकरे यांच्या शिकवणीनुसार ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण याप्रमाणे परमेश्वर जी सातपुते यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा करून आपले सामाजिक दायित्व पूर्ण केले यामध्ये पिंपळनेर भागातील सनराईज इंग्लिश स्कूल, डाक बंगला वस्ती शाळा, बाभळवाडी जिल्हा परिषद शाळा या ठिकाणी शिक्षण घेणाऱ्या चिमुकल्यांना शालेय साहित्याचे वाटप व खाऊचे




वाटप करण्यात आले व जिव्हाळा शहरी बेघर निवारा केंद्र येथे दीपक घोडके व डॉक्टर पंकज घोडके यांनी वाढदिवसाच्या निमित्ताने अनाथ बेघर लोकांना अन्नदानाचे पुण्यकाम केले परमेश्वर सातपुते यांच्या वाढदिवसानिमित्त इतर अनेक लोक उपयोगी उपक्रमांनी वाढदिवस साजरा करण्यात आला जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने शिवसेना मराठवाडा संपर्क नेते तथा आमदार सुनीलजी प्रभु साहेब व बीड जिल्हा खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी फोनद्वारे शुभेच्छा दिल्या व शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ.ज्योतीताई मेटे यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन वाढदिवसाच्या विशेष शुभेच्छा दिल्या. बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव साहेब व सहसंपर्कप्रमुख बाळासाहेबजी अंबुरे साहेब, प्रारंभ चे संपादक जालिंदरजी धांडे, मराठवाडा पत्रचे संपादक दत्तात्रय नरनाळे, कार्यारंभ चे उपसंपादक केशवजी कदम,उपजिल्हाप्रमुख हनुमान जिजा जगताप,उपजिल्हाप्रमुख आशिषजी मस्के, उपजिल्हाप्रमुख आजिनाथ खेडकर,जिल्हासमन्वयक संजय भाई

◀◀ पान ३ वर

# मु.का.अ.संगितादेवी पाटील यांच्या हस्ते स्वच्छ बचत गटासोबत संवाद मोहीम उपक्रमाचा शुभारंभ

**बीड । प्रतिनिधी**



जिल्ह्यातील १३५० गावात घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाचे काम सुरू आहे. दररोज प्रत्येक कुटुंबाचा जमा झालेला कचरा त्याचे वर्गीकरण कुटुंब स्तरावरच करण्यासाठी मानसिकता तयार करण्याकरिता आता स्वच्छ बचत गटांचा पुढाकार असणार आहे अशी माहिती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संगिता देवी पाटील यांनी दिली आहे. ''स्वच्छतेचे काम, स्वच्छ बचत गटा सोबत संवाद मोहीम '' या उपक्रमाचा शुभारंभ आज करण्यात आला त्यावेळी त्या बोलत होत्या.

जिल्ह्यातील तेराशे पन्नास गावात घनकचरा सांडपाणी व्यवस्थापन व प्लास्टिक व्यवस्थापनाचे काम सुरू आहे. प्रत्येक गावात जमा होणाऱ्या कचऱ्याचे वर्गीकरण केंद्र तयार करण्यात आलेले आहे. कुजणारा व न कुजणारा कचऱ्याचे वर्गीकरण करण्यासाठी कुटुंबातील सर्व सदस्यांची मानसिकता तयार करणे अत्यंत आवश्यक आहे. जमा झालेल्या कचऱ्याचे वर्गीकरण जर केले नाही तर कचऱ्याचे योग्य विघटन होणार नाही व त्याचा ताण ग्रामपंचायत वरती येणार आहे. त्यामुळे दृश्यमान स्वच्छतेची सुरुवात कुटुंब स्तरावर होण्यासाठी गृहभेटी हा एकमेव जनजागृतीचा मार्ग सध्या प्रभावी ठरणार आहे. त्यामुळे प्रत्येक गावातील बचत गटातील सदस्य स्वच्छतेच्या या उपक्रमात सहभागी होणार आहेत अशी माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिली आहे. स्वच्छतेच्या उपक्रमात हिरवा रंग ओल्या कचऱ्यासाठी तर निळा रंग सुक्या कचऱ्यासाठी असल्यामुळे याबाबतची माहिती सर्व महिलांना देण्याकरिता ही संवाद मोहीम आयोजित केली असल्याची माहिती विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सुधाकर मुंडे यांनी दिली आहे.

साथीचे आजार थांबवायचे असतील व सार्वजनिक आरोग्य व्यवस्थित ठेवायचे असेल तर सांडपाणी तसेच घनकचऱ्याचे योग्य व्यवस्थापन झालेच पाहिजे ही भूमिका ग्रामपंचायतीची आहे. परंतु सांडपाणी व कचरा करणारे लोक गावातीलच आहे त्यामुळे अगोदर या संबंधीची मानसिकता तयार करून कचरा वर्गीकरण शेडमध्ये जमा होण्याकरिता नियोजन केले असल्याचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले आहे.

३१ ऑगस्ट पर्यंत चालणाऱ्या या गृहभेटीच्या संवाद मोहिमेत सर्व बचत गटांच्या सदस्यांनी सहभागी व्हावे तसेच दृश्यमान स्वच्छतेसाठी जनजागृती करावी सांडपाणी व्यवस्थापना संबंधी ची माहिती देणाऱ्या या उपक्रमाचे सनियंत्रण उमेद तालुका कार्यालय व स्वच्छ भारत मिशन गट कार्यालय यांचे मार्फत होणार आहे अशी माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिली आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyalokt anatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# दुचाकीवरुन आले, कोयत्याने वार करुन पसार झाले; पुण्यात हल्लेखोर अन् सायकलचोरांची दहशत

## ८ ते १० जणांविरोधात गुन्हा दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

शैक्षणिक पंढरी आणि पुण्य नगरी असलेल्या पुणे शहराला काय झालंय, येथील कायदा व सुव्यवस्थेचे सातत्याने धिंदवडे निघत आहेत. काही दिवसांपूर्वी कार अपघातामुळे पुणे चर्चेत होतं, त्यानंतर ड्रग्ज प्रकरणामुळे, पुन्हा बोगस प्रमाणपत्रामुळे तर आता कोयता गँगमुळे पुणे पोलिसांना आव्हान निर्माण झालं आहे. पुणे शहरात कोयत्याने हल्ला करण्याच्या घटनांमध्ये पुन्हा वाढ झाली असून पुण्यात दोन तरुणांवर आठ ते दहा जणांच्या टोळक्याने कोयत्याने हल्ला केल्याची घटना घडली. मात्र, २४ तास उलटून गेले तरीसुद्धा आरोपी पोलिसांच्या ताब्यात नाहीत. या हल्लेखोरांनी हातावर, मनगटावर आणि पायावर कोयत्याचे सपासप वार केल्याचं दिसून येत आहे. याप्रकरणी २७ वर्षीय तरुणाने चंदननगर पोलिसात फिर्याद दिली केली आहे. त्यानुसार, ८ ते १० जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसरीकडे वारजेमध्ये तब्बल ३० सायकली चोरल्याची घटना उघडकीस आली आहे.

पुण्यात पुन्हा कोयता गँग किंवा कोयत्याने हल्ला करणाऱ्यांची दहशत निर्माण झाली आहे. वडगाव शेरी भागातील सत्यम सेरेनिटीमध्ये मंगळवारी रात्री ११.३० वाजता दोघांवर ८ ते १० जणांच्या टोळक्याने कोयत्याने हल्ला केल्याची घटना घडली. फिर्यादी हे त्यांच्या चार ते पाच मित्रासोबत गप्पा मारत बसले होते. अचानकपणे ४-५ मोटरसायकलवरुन ८ ते १० जणं त्याठिकाणी आले आणि त्यांनी फिर्यादी यांना शिवीगाळ करायला सुरुवात केली. विश्व्या कुठे आहे? असे म्हणुन त्या टोळक्याने फिर्यादी यांना विश्वजीत बरोबर का राहतो? जिवंत सोडणार नाही असे म्हणुन फिर्यादीच्या अंगावर कोयता उगारला. तो घाव वाचवण्यासाठी फिर्यादी यांच्या मित्राने त्यांचा हाथ मध्ये घातला असता त्यांच्यावरही कोयत्याचे वार पडले आहेत. या हल्ल्यात फिर्यादीसह १९ वर्षीय तरुण गंभीर जखमी झाला आहे. विशेष म्हणजे या घटनेला २४ तासांपेक्षा अधिक काळ उलटून गेला असून देखील आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतलेले नाही. दुसरीकडे वारजे येथे तब्बल ३० सायकली चोरणाऱ्या दोघांना अटक करण्यात आली आहे.



वारजेत सायकल चोरट्यांना अटक

पुण्यात जॉयराईड साठी एक नव्हे, दोन नव्हे तर तब्बल ३० सायकल चोरी करणाऱ्या २ चोरट्यांनी वारजे पोलिसांनी अटक केली आहे. पुण्यातील उच्चभ्रू कर्वेनगर, कोथरूड भागातील अनेक सोसायटीमधून महागड्या किमतींच्या सायकल चोरी होण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली होती. या घटनांचा तपास करताना पोलिसांनी शिवशंकर जाधव आणि अभिषेक जाधव यांना अटक केलीय. एका सोसायटीमधून सायकल चोरायची, मजा लुटून ती कुठल्याही भागात ते ती सायकल सोडून देत, त्यानंतर नवीन सायकल शोधायचे. अशा सायकल चोरट्यांच्या मुसक्या आवळण्यात पोलिसांना यश आले आहे.

# निवारा केंद्रास जीवनाश्याक साहित्य देऊन मदतीचा हात

**पिंपरी । प्रतिनिधी**

विश्वगुरु धाम फौंडेशन आणि मानव संसाधन विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने सावली निवारा केंद्राला जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करून मदतीचा हात दिला.

यावेळी मानव संसाधन विकास संस्थेचे सरचिटणीस सुनील उबाळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, विश्वगुरू धाम फाउंडेशनचे अध्यक्ष अशोक साळे यांचा चिरंजीव शुभम याचा वाढदिवसनिमित्त रियल पीपल रियल लाइफ पिंपरी येथील सावली निवारा केंद्र या अनाथाश्रमात साजरा केला. यावेळी अनाथ आश्रमास १०० किलो तांदूळ, ब्लँकेट्स, बेडशीट्स, हाउस किपिंगचे साहित्य देण्यात आले . यावेळी प्रमुख उपस्थिती मानव संसाधन विकास संस्थेचे राष्ट्रीय मुख्य सचिव सुनील उबाळे, राष्ट्रीय अध्यक्षा महिला नलिनी शिंदे, महाराष्ट्र प्रदेशच्या जनसंपर्क अधिकारी अंजलीताई बर्मन , पिंपरी चिंचवडचे विशेष नियुक्त सदस्य प्रकाश खरात या सर्वांच्या हस्ते सर्व वस्तूंचे वाटप करण्यात आले. यावेळी मानव संसाधन विकास संस्थेचे ड. अनिल म्हाळसकर यांच्या वतीने सुनील उबाळे यांनी संस्थेची ध्येय धोरण व संस्था स्थापनेचा हेतू सांगितला . यावेळी आश्रमातील गरजूंना सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन मानव संसाधन विकास संस्थेच्या वतीने सुनील उबाळे यांनी दिले. यावेळी नलिनी शिंदे यांनी आभार व्यक्त केले.

# ऑलिम्पिकवीर नेमबाज स्वप्निल कुसाळेने घेतले दगडूशेठ गणपतीचे दर्शन

**पुणे । प्रतिनिधी**

ऑलिम्पिक पदक विजेता स्वप्निल कुसाळे भारतात परतला आहे. आज ढोल ताशाच्या गजरात स्वप्निल कुसाळेचे पुणे विमानतळावर भव्य स्वागत करण्यात आले. स्वप्निल कुसाळेने श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती बाप्पाची आरती करून मनोभावे दर्शन घेतले. यावेळी ट्रस्टकडून त्याला शुभेच्छा देत श्रींची मूर्ती भेट देऊन स्वागत सत्कार करण्यात आले.




महाराष्ट्राचा नेमबाज स्वप्निल कुसाळेने ५० मीटर रायफल थ्री पोझिशनच्या प्रकारात कांस्य पदक पटकावलं आहे. या स्पर्धेत स्वप्निलने एकूण ४५१.४ गुण प्राप्त केले. पॅरिस येथून स्वप्निल हा आज भारतात परत आला असून पुणे विमानतळावर त्याचे जोरदार स्वागत करण्यात आले. यानंतर स्वप्निलने पुण्यातील श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात दर्शन घेत आरती केली. यावेळी ट्रस्टकडून स्वप्निलचे स्वागत करण्यात आले.

# ऊस दर नियंत्रण मंडळाची बैठक घेऊन दुसऱ्या हप्त्यास मान्यता द्या

## राजू शेट्टी यांनी घेतली साखर आयुक्तांची भेट

**पुणे । प्रतिनिधी**

साखरेसह इथेनॉल व अन्य उपपदार्थांना चांगले दर मिळाल्याने साखर कारखान्यांकडे एफआरपीची रक्कम देऊन पैसे शिल्लक राहत आहेत, ही उद्योगासाठी चांगली बाब आहे. त्यामुळे मागील हंगाम २०२२-२३ मधील गळीत हंगामातील तुटलेल्या ऊसाचे शंभर व पन्नास दुस-या हप्त्याचे पैसे तातडीने देण्यास ऊस दर नियंत्रण समितीने त्वरित मान्यता देण्याची मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी साखर आयुक्त डॉ. कुणाल खेमनार यांच्याकडे केली आहे.



साखर संकुल येथे दि.८ दुपारी साखर आयुक्तांची भेट घेऊन शेट्टी यांनी विविध प्रलंबित प्रश्नांवर चर्चा केली. त्यावेळी स्वाभिमानीने मांडलेल्या विविध मुद्यांवर आणि ऊस दर नियंत्रण मंडळाची बैठक त्वरित घेण्यासाठी पावले उचलण्यात येत असल्याचे साखर आयुक्तांनी स्पष्ट केले.

उसाच्या मागील हंगामातील रास्त आणि किफायतशीर किंमतीपेक्षा जादा पैसे देण्यासाठी राज्यातील सर्व कारखान्यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेत ठराव करणे गरजेचे आहे. मे महिन्यातच स्वाभिमानीने याबाबत साखर आयुक्तांकडे केलेल्या मागणीनुसार साखर आयुक्तांनीही लेखी पत्राद्वारे सर्व कारखान्यांना कळविले आहे. साखर आयुक्तांनी गत हंगामातील कारखान्यांची अंतिम दरासाठीची व पुढील हंगामातील पहिल्या उचलीची बैठक तातडीने लावून हंगामाआधीच प्रश्न सोडविण्याची मागणीही शेट्टी यांनी केली.

अंतरानुसार ऊस तोडणी वाहतुकीचे दर हवेत

शेतकर्यांच्या वतीने साखर कारखाने उसाची तोडणी आणि वाहतूक करतात. त्यांचा खर्च अंतरानुसार कपात करुन तो दर वाजवी ठेवण्यात यावा, अशीही महत्वपूर्ण मागणी शेट्टी यांनी यावेळी चर्चेत केली. कारखाने तोडणी वाहतूक खर्चात इतरही खर्च लावतात आणि कार्यक्षेत्राबाहेरीलही ऊस आणून शेतकर्यांवर भुर्दंड टाकतात. तो येत्या हंगामापासून बंद झाला पाहिजे, अशीही मागणी साखर आयुक्तांकडे केली.

# हायवाखाली चिरडून दुचाकीस्वाराचा मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

भरधाव हायवाने एका दुचाकीला धडक दिली. हायवाच्या चाकाखाली चिरडून दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. हा अपघात बुधवारी (दि. ७) सायंकाळी पावणे सात वाजताच्या सुमारास इंडुरन्स चौक ते एच पी चौकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर महाळुंगे येथे घडला.

सीताराम सुरेश शिंदे (वय २५, रा. सिद्धीविनायक नेस्ट, मोहन नगर, तळेगाव दाभाडे) असे मृत्यू झालेल्या दुचाकीस्वराचे नाव आहे. याप्रकरणी सखाराम रंगनाथ सोळसे (वय ४०, रा. इंदोरी, ता. मावळ) यांनी महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार हायवा (एमएच १४/जीयु ४२२४) चालक दिनेश हुरगुडे याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सीताराम शिंदे नाणेकरवाडी येथे एका खासगी कंपनीत नोकरीस होते. ते बुधवारी काम संपल्यानंतर सायंकाळी त्यांच्या दुचाकीवरून घरी जात होते. इंडुरन्स चौक ते एच पी चौकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर महाळुंगे येथे हायवाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. या अपघातात सीताराम शिंदे रस्त्यावर पडले. हायवाच्या चाकाखाली चिरडल्याने त्यांचा मृत्यू झाला. महाळुंगे एमआयडीसी पोलीस तपास करीत आहेत.

# वायुसेना आणि नौदलाच्या निवृत्त अधिकाऱ्यांची एक कोटी तीस लाखांची फसवणूक

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहरात दोन वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये शेअर ट्रेडिंगच्या बहाण्याने वायुसेना आणि नैदालातून निवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांना ऑनलाईन गंडा घालण्यात आला आहे. दोन अधिकाऱ्यांची तब्बल एक कोटी तीस लाखांची फसवणूक झाली आहे. व्हाटस अप द्वारे संपर्क करत सायबर गुन्हेगारांनी दोन्ही अधिकाऱ्यांना चांगल्या परताव्याचे आमिष दाखवले होते.




वायुसेनेतून निवृत्त झालेल्या अधिकाऱ्याला अपर सर्किट स्टॉक आणि आयपीओ मध्ये गुंतवणूक करण्यास सायबर गुन्हेगारांनी भाग पाडले. त्यातून निवृत्त अधिकाऱ्याची ७७ लाख रुपयांची फसवणूक केली. तर दुसऱ्या प्रकरणात नौदलातून निवृत्त झालेल्या अधिकाऱ्याला शेअर ट्रेडिंगचे क्लास लावण्याच्या बहाण्याने ५४ लाखांचा गंडा घालण्यात आला. सोशल मिडियावर आलेल्या एका जाहिरातीवर वायुदलातील निवृत्त अधिकाऱ्याने क्लिक केले. त्यानंतर त्यांना एका व्हाटस अप ग्रुपमध्ये जॉईन करण्यात आले. त्यांना गुंतवणूक केल्यास चांगला नफा मिळेल असे आमिष दाखवण्यात आले. सायबर गुन्हेगारांनी खोटा इलेक्ट्रोनिक अभिलेख तयार करून त्यात निवृत्त अधिकाऱ्याने गुंतवलेल्या ७७ लाखांच्या बदल्यात चार कोटी तीन लाख रुपये जमा झाल्याचे दाखवण्यात आले. ती रक्कम काढून घेण्यासाठी त्यांच्याकडे वेगवेगळ्या कारणांसाठी मोठ्या रकमेची मागणी करण्यात आली. नौदलातून निवृत्त झालेल्या अधिकाऱ्याला सुरुवातीला ट्रेडिंगशी संदर्भात काही व्हिडीओ पाहण्यास सांगण्यात आले. त्यानंतर त्यांना एक एप डाउनलोड करण्यास सांगितले. त्यातून गुंतवणूक करण्यास भाग पाडत त्यांचीही ५४ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली. पुणे सायबर पोलीस तपास करीत आहेत.

### जागतिक आदिवासी दिनानिमित्त आदिवासी कलाकृतींच्या प्रदर्शनाचे आयोजन

**पुणे । प्रतिनिधी**

जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधून आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (टीआरटीआय) येथे ९ ते १० ऑगस्ट या कालावधी आदिवासी हस्तकला प्रदर्शन व विक्री, खाद्यमहोत्सव व कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

प्रदर्शनाचे उदघाटन ९ ऑगस्ट रोजी सकाळी १०.३० वाजता होणार आहे. या प्रदर्शनात राज्यातील विविध भागातील आदिवासी कलाकारांनी तयार केलेल्या बांबू, लाकडाच्या, कापडाच्या दैनंदिन वापराच्या व शोभेच्या वस्तू, वारली चित्रकला, खाद्यपदार्थ, रानभाज्या, वनऔषधे आदींचे प्रदर्शन व विक्रीसाठी स्टॉल उभारण्यात येणार आहेत. आदिवासी कलासंस्कृतीचे जतन, संवर्धन आणि प्रचार व प्रसार करणाऱ्या या प्रदर्शनास अधिकाधिक नागरिकांनी भेट द्यावी. आदिवासी कलाकारांनी तयार केलेल्या वस्तू खरेदी करून कलाकारांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन संस्थेच्या सहसंचालक चंचल पाटील यांनी केले आहे.

# पूजा खेडकरांच्या वडिलांविरोधात पोलिसात तक्रार अर्ज दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

आयएएस पद गमावून बसलेल्या अधिकारी पूजा खेडकर यांचे वडील दिलीप खेडकर यांच्या विरोधात पुणे पोलिसांत कामात अडथळा आणल्याप्रकरणी तक्रार दाखल झाली आहे. त्यांच्यावर अदखपात्र गुन्हा दाखल होणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या तक्रारीमुळे खेडकर कुटुंबीय हे पुन्हा अडचणीत येणार असल्याचे दिसत आहे.

पोलिसांनी अर्जाची चौकशी सुरू केली आहे. पुण्यातील बंडगार्डन पोलिस ठाण्यात जिल्हाधिकारी कार्यालयातील एका तहसीलदाराने दोन पानी तक्रार अर्ज दिला आहे. पुणे पोलिसांकडून या अर्जाची चौकशी सुरू करण्यात आली असून, त्यानुसार पुढील कारवाई केली जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे. आयएएस प्रशिक्षणार्थी म्हणून पूजा खेडकर यांची पुण्यातील जिल्हाधिकारी कार्यालयात बदली झाली होती दरम्यान यानंतर मात्र त्या स्वतंत्र कॅबिन, शिपाई



तसेच खासगी गाडीवर अंबर दिवा यामुळे वादग्रस्त ठरल्या. त्यांनी व त्यांच्या वडिलांनी जिल्हाधिकारी कार्यालयात येऊन पुजा यांना सुविधा द्यावी यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांवर दबाव आणला होता. याबाबत जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी शासनाला एक अहवाल सादर केला होता.

तत्पूर्वी प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांना स्वतंत्र दालन, शिपाई किंवा इतर गोष्टी नसतात. मात्र पूजा खेडकरने यासाठी आग्रह धरला होता. यावादातूनच त्यांची वडिलांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांवर दबाव आणला होता. यामुळे त्या वादात अडकल्या. त्यात आता त्यांचे आयएएस पददेखील रद्द झाले आहे. दरम्यान, आता याप्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्वसाधारण विभागाचे तहसीलदार यांनी कामात अडथळा आणला असल्याबाबत तक्रार अर्ज बंडगार्डन पोलिसांकडे दिला आहे. त्या अर्जाची चौकशी सुरू केली असून, तहसीलदारांचा जबाब नोंदविणे बाकी आहे.

# गुदमरलेली उद्योनगरी हिंजेवडी

**पुणे । प्रतिनिधी**

हिंजेवडी, पुण्याचे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे खढ पार्क, आधुनिक तंत्रज्ञान आणि प्रगत उद्योगांचे केंद्र म्हणून ओळखले जाते. मात्र, या विकसित क्षेत्राच्या वाढत्या यशासह अनेक समस्या उद्भवू लागल्या आहेत. या समस्यांमध्ये वाहतूक कोंडी, फसलेले वाहतूक नियोजन, अर्धवट रस्त्यांचे जाळे, लहान रस्ते, मेट्रोच्या कामामुळे निर्माण होणाऱ्या अडचणी, आणि वायू प्रदूषण यांचा समावेश आहे.

**वाहतूक कोंडी आणि फसलेले वाहतूक नियोजन:** वाहतूक कोंडी हे हिंजेवडीचे सर्वात मोठे संकट आहे. रोजच्या वाहतुकीत लाखो वाहनांची गर्दी होते, ज्यामुळे नित्याचे आयुष्य विस्कळीत होते. या कोंडीमुळे कामाच्या ठिकाणी पोहोचण्यासाठी लागणारा वेळ लक्षणीयरीत्या वाढतो, आणि परिणामी लोकांच्या उत्पादकतेवरही परिणाम होतो. हिंजेवडीतील अनेक कर्मचारी, विशेषत: आयटी उद्योगातील, रोजच्या प्रवासात बराच वेळ वाया घालवतात. यामुळे त्यांची कामगिरी कमी होते आणि त्यांचे मानसिक आरोग्यही प्रभावित होते. या वाहतूक समस्यांमुळे आणि त्यामुळे होणाऱ्या ताणामुळे, ३६ खढ कंपन्यांनी हिंजेवडीतून स्थलांतर केले आहे. हे स्थलांतर म्हणजे केवळ कंपन्यांसाठीच नव्हे, तर हिंजेवडीच्या अर्थव्यवस्थेसाठीही एक मोठा धक्का आहे. त्यामुळे रोजगाराच्या संधींमध्ये घट झाली आहे आणि स्थानिक अर्थव्यवस्थेवर परिणाम झाला आहे. वाहतूक नियोजन फसलेले दिसते, कारण अर्धवट रस्त्यांचे जाळे आणि लहान रस्त्यांमुळे वाहतुकीचा योग्य प्रवाह साधता येत नाही. रस्त्यांचे दुरुस्तीचे कामे वेळेवर पूर्ण न झाल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. शिवाय, मेट्रोचे काम चालू असताना, रस्ते आणखी अरुंद होतात आणि वाहतूक कोंडी अधिकच वाढते. या सगळ्या समस्यांमुळे हिंजेवडीतील कर्मचारी आणि स्थानिक नागरिकांना दररोज ताणतणाव सहन करावा लागतो.

**वायू प्रदूषण:** वाहनांची संख्या वाढल्यामुळे वायू प्रदूषणही वाढले आहे. हवेतील प्रदूषणामुळे आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो. विशेषतः लहान मुले, वृद्ध आणि श्वसनासंबंधी समस्या असणाऱ्या व्यक्तींना अधिक त्रास सहन करावा लागतो. वाढत्या वायू प्रदूषणामुळे दमा, श्वसनाच्या समस्या, हृदयविकार इत्यादी आजारांचा धोका वाढला आहे.



**उपाययोजना:** १.सार्वजनिक वाहतुकीचे सक्षमीकरण: पुणे महानगर परिवहन महामंडळ आणि पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण यांनी अधिक बस सेवा सुरू कराव्या, ज्यामुळे वाहनांची गर्दी कमी होईल. या बसेसची वेळापत्रक आणि मार्ग नियोजन योग्य पद्धतीने केल्यास प्रवाशांना अधिक सुविधा मिळतील.

२. रस्त्यांचे दुरुस्तीचे कामे: अपूर्ण रस्त्यांमुळे वाहतूक कोंडी वाढते, त्यामुळे रस्त्यांची देखभाल आणि सुधारणा करण्यात येणारा वेळ कमी करणे अत्यावश्यक आहे. रस्त्यांचे रुंदीकरण करणे आणि नवीन रस्ते बांधणे हे देखील गरजेचे आहे, ज्यामुळे वाहतुकीचा प्रवाह सुरळीत होईल.

**३.मेट्रो प्रकल्पाचा वेग:** मेट्रो प्रकल्पामुळे सुरुवातीला काही काळ अडचणी येऊ शकतात, पण एकदा मेट्रो सेवा सुरु झाल्यानंतर वाहतूक कोंडी खूप कमी होईल. त्यामुळे मेट्रोच्या कामात गती आणणे आवश्यक आहे. मेट्रोचे काम वेळेत पूर्ण झाल्यास नागरिकांना प्रवासाची सोपी आणि जलद सुविधा मिळेल.

**४. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर:** स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत हिंजेवडीतील वाहतूक व्यवस्थापनासाठी खेढ(Internet of Things) आणि -I (-rtificial Intelligence) तंत्रज्ञानाचा वापर केला जाऊ शकतो. यामुळे वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी, वाहतुकीचा डेटा संकलित करून, त्या आधारे योग्य निर्णय घेता येतील.

**५. सायकल ट्रॅक आणि पायी चालणाऱ्यांसाठी सुरक्षित रस्ते:** लहान अंतरांवर प्रवास करणारे लोक सायकलचा वापर करतील, ज्यामुळे वाहनांची गर्दी कमी होईल. सायकल ट्रॅक तयार केल्याने आणि पायी चालणाऱ्यांसाठी सुरक्षित पायवाट उपलब्ध करून दिल्यास, वाहनांच्या वापरावर नियंत्रण ठेवता येईल.

६.पर्यावरणपूरक वाहनांचा वापर: वायू प्रदूषण कमी करण्यासाठी इलेक्ट्रिक वाहनांचा वापर, कार पूलिंग, आणि इतर पर्यावरणपूरक पद्धतींचा अवलंब केल्याने वायू प्रदूषण कमी होईल.

७. रुंद उड्डाण पूल बांधणे: यामुळे वाहतुकीचा प्रवाह सुरळीत होईल आणि वाहतूक कोंडी कमी होईल.

८. रिंग रोडला गती देणे: हिंजेवडीतून जाणाऱ्या रिंग रोडला गती दिल्यास वाहतुकीचा प्रवाह सुकर होईल.

९. पर्यायी रस्ते बांधणे: मुख्य रस्त्यांवरील भार कमी करण्यासाठी पर्यायी रस्ते बांधणे आवश्यक आहे.

१०.नदीवर पूल बांधणे: वाहतूक बाणेर आणि सुस रोड कडून वळवण्यासाठी नदीवर पूल बांधल्यास वाहतूक कोंडी कमी होईल.

११. हिंजेवडीचा पूल मोठा करणे: वाहतुकीचा प्रवाह वाढवण्यासाठी हिंजेवडीचा पूल मोठा करणे आवश्यक आहे.

**१२. वक्राकार वाहतुकेचे योग्य नियोजन:** वाहतुकीचा प्रवाह सुरळीत ठेवण्यासाठी वक्राकार वाहतुकेचे योग्य रितेने नियोजन करणे आवश्यक आहे.निष्कर्ष एकूणच, हिंजेवडीतील वाहतूक आणि वायू प्रदूषण समस्या सोडवण्यासाठी सर्वांगीण उपाययोजना आवश्यक आहेत. शासन, स्थानिक प्रशासन आणि नागरिकांनी एकत्र येऊन या समस्येवर मात केली तरच हिंजेवडीचे भविष्य उज्ज्वल होईल. हिंजेवडीतील विकासासह नागरिकांच्या जीवनमानातही सुधारणा घडवून आणणे अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रशासनाने दूरदृष्टीकोन ठेवून विकास करायला हवा, ज्यामुळे हिंजेवडीचे नाव केवळ तंत्रज्ञानासाठी नव्हे, तर उत्तम व्यवस्थापन आणि नियोजनासाठी देखील ओळखले जावे, हीच अपेक्षा आहे.